# चैतन्य लहरी

अंक क्र. १,२

जानेवारी, फेब्रुवारी २००१



तुम्हाला सर्व विश्वात परिवर्तन घडवून आणायचे आहे; याला महत्त्व द्या.
ती वेळ आता आलेली आहे. नवीन क्लुप्त्या व कल्पनांना धरुन कार्यासाठी सज्ज व्हा.

**प. पू. श्री माताजी निर्मलादेवी**

संक्रांती पूजा, प्रतिष्ठान, पुणे, १४ जानेवारी,२००१



# • अनुक्रमणिका •


| | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ''चालविशी हात धरूनिया'' | २ |
| २ | खिसमस पूजा<br>श्री माताजींचे प्रवचन (संक्षिप्त)<br>गणपतीपुळे २५.१२.२००० | ४ |
| ३ | गणपतीपुळे विवाहप्रसंगी नववधूंना केलेला उपदेश | ६ |
| ४ | कळवा पूजा<br>श्री माताजींचे प्रवचन (संक्षिप्त) दि. ३१/१२/२०००<br>इंग्रजी भाषणाचा सारांश | ७ |
| ५ | कळवा पूजा मराठी भाषणाचा सारांश | १० |
| ६ | गणतंत्र दिवसाच्या प्रसंगी<br>श्रीमाताजींनी केलेला उपदेशाचा सारांश प्रतिष्ठान पुणे २६-१-२००१ | ११ |
| ७ | संक्रांती पूजा प्रतिष्ठान<br>पुणे, १४-१-२००१ | १२ |
| ८ | श्री चंद्रिका प्रसाद श्रीवास्तव साहेब यांचा संदेश | १३ |
| ९ | गणपतीपुळे २००० सेमिनार वृत्तांत | १४ |
| १० | श्री गणेश पूजा<br>प. पू. श्री माताजी निर्मलादेवींचे भाषण कबेला : १६ सप्टेंबर २००० | १७ |
| ११ | सहज समाचार | २० |
| १२ | लहान मुलांविषयी<br>प. पू. श्री माताजी निर्मलादेवींचे भाषण, पर्थ २ मार्च ८५ | २१ |


**सहजयोगाचा प्रसार करा. मी जे उद्दिष्टांचे चित्र उभे केले आहे ते फार भव्य आहे. तुम्ही खूप परिश्रम घेतले पाहिजेत. हे जाणले पाहिजे की माझे चित्त कुठे भरकटतेय, काय करते, आपण काय करतो. श्री माताजींच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आम्ही काय करतो?**

**प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवी संक्रांती पूजा प्रतिष्ठान– १४ जानेवारी २००१**

# "चालविशी हात धरूनिया"

तिसरे सहस्रक नुकतेच सुरू झाले आहे. जगभरातील मानवजातीच्या विविध संदर्भातील घडामोडींकडे एक दृष्टिक्षेप टाकताना त्यामध्ये एक अंतर्भूत प्रवाह असावा असे जाणवते व त्या दृष्टीने हे नवीन सहस्रक मानवजातीच्या इतिहासातील एक अलौकिक काल ठरणार आहे. तसे पाहिले तर सहस्रकाएवढ्या काळाचा भविष्यकालीन आढावा घेणे व त्याची कल्पना करणे सामान्यतः कठीणच असते. खरे म्हणायचे तर उद्या काय होणार आहे - तात्त्विक प्रणालीप्रमाणे पुढच्या क्षणात काय होणार आहे - हे जाणण्यात मानवी सीमित बुद्धि असमर्थच आहे. तरीही मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाकडे लक्ष दिल्यास नवीन सहस्रकाची वाटचाल कुठल्या दिशेने होणार आहे याचा अंदाज करण्याचा प्रयत्न वावगा ठरणार नाही.

जसजसा काळ लोटतो तसतशी मानवी उत्क्रांतीच्या वाढत्या टप्प्यांवरची प्रगति अधिकाधिक गतिमान होत आली आहे असे उत्क्रांती शास्त्रातील जाणकार लोक सांगतात.

गेल्या एक-दोन शतकात व विशेषतः दोन दशकांत विज्ञानशास्त्राने मोठी भरारी मारली आहे. चालू शतकातच त्यामध्ये आणखी प्रचंड प्रगति होण्याची लक्षणे दिसत आहेत. या प्रगतिपथावरील वाटचालीतील व त्याचा मानवीजीवनावरील सर्वांगीण परिणामामधील चांगला भाग पाहिला तर दिसून येईल की जगातील विविध देशांतील विविध धर्मांचे लोक एकमेकांच्या जास्त जवळ येत आहेत. सध्या भौतिक स्तरावर (उदा. व्यापार) सर्व देशांतील लोकांना एकत्र येण्यावाचून पर्याय नाही अशी जाणीव प्रत्येक देशांत निर्माण होऊ लागली आहे. आर्थिक व्यवसाय व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात निर्माण झालेली ही सामूहिक अस्तित्वाच्या अपरिहार्यतेची जाणीव हळूहळू इतर क्षेत्रांमध्येही पसरेल अशी आशा वावगी ठरणार नाही. या सर्व घडामोडींचा मानवी जीवनावर खऱ्या अर्थाने विधायक परिणाम होण्यासाठी या प्रक्रियेमधील आक्रमकपणा, हुकूमत व एकाधिकार गाजवण्याच्या कल्पना, स्वार्थ, मत्सर, स्पर्धा व चढाओढ इ. अनिष्ठ प्रवृत्ति कमी होण्यासाठी मानवप्राण्यांमध्ये समग्र आंतरीक परिवर्तन घटीत होणे आवश्यक आहे. त्यासाठीच भौतिक व अध्यात्मिक अशा दोन्ही स्तरांवर ही नवीन धार्मिकता - हाच विश्व निर्मल धर्म - मानवजातीमध्ये रुजणे अत्यंत आवश्यक आहे व तीच या तिसऱ्या सहस्राची अलौकिक वाटचाल ठरणार आहे. मानवजातीला त्याशिवाय भविष्य नाही वा पर्याय नाही.

या भविष्याची नांदी गेल्या शतकातच झालेल्या आदिशक्तीच्या अवतरण स्वरूपात प. पू. श्रीमाताजींनी सुरू केलेल्या सहजयोगामधून झाली. सन १९७० पासून सुरू झालेल्या सहजयोगामधून विनासायास व सहजमार्गाने होणाऱ्या कुण्डलिनी जागृतीची मानवाला चैतन्यलहरींद्वारे मिळणारी प्रत्यक्ष अनुभूति ही घटनासुद्धा नाडीग्रंथात नमूद केलेल्या भविष्यवाणीप्रमाणेच साकारली. आज जगभरात पसरलेल्या लाखो सहजयोग्यांना साक्षात आदिशक्तीकडून हा महायोग मिळाला; त्यांचाच अमृतवाणीमधून त्यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद आपणा सर्वांना मिळत आहेत हे आपले परमभाग्य आहे.

आणि म्हणूनच आपणा प्रत्येक सहजयोग्याला सहजयोग समस्त मानवजातीपर्यंत पोचवण्याची जबाबदारी उचलायची आहे. सहजयोग जगभर सर्वत्र पसरावा हे श्रीमाताजींचे स्वप्न आहे व नवीन सहस्रकात ते साकार करण्यासाठी सर्वांनी सिद्ध झाले पाहिजे. त्यासाठी श्रीमाताजींच्या उपदेशानुसार सहजयोग स्वतःपुरता किंवा कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता चैतन्यलहरींमध्ये अधिकाधिक प्रगल्भ होऊन गहनतेत उतरला पाहिजे. तसे झाले की आपल्याला मिळालेल्या शक्तीवर आपली निष्ठा बसेल; निष्ठा दृढ झाली की श्रद्धा बळावेल आणि श्रद्धेमधून समर्पण बळकट होईल. मग आपण स्वतः किती व कसे करू शकणार अशा शंका मनात उरणार नाहीत. कारण सहजयोग्यांचे व्यक्तिमत्त्वच लोकांवर प्रभाव पाडेल व त्यांना सहजयोगाचे महत्त्व पटून ते त्याचा स्वीकार करतील.

जसजशी सहजयोग्यांची संख्या वाढेल तसतशी त्यांची सामूहिकता बळकट होत जाईल व जगातील अध्यात्मिकतेची उणीव भरून येत जाईल व सामूहिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिकाधिक वेगवान बनत जाईल. हीच नवीन सहस्रकाची सध्याची पहाट ठरणार आहे.

श्री हनुमानांच्या वानरसेनेने सागरावर सेतू बांधण्यासाठी 'जय श्रीराम' असे नाव घेत टाकलेले दगड पाण्यावर तरंगले व सेतू तयार झाला अशी कथा आहे. त्याचाही आशय हाच आहे. त्याचप्रमाणे सर्व सहजयोग्यांनी श्री. माताजींच्या चरणी संपूर्णपणे समर्पित होऊन ''चालवीशी हात धरूनिया' अशी त्यांच्या चरणी श्रद्धा ठेवून कार्याला लागल्यावर नवीन सहस्रक मानवजातीसाठी उज्ज्वल होईल यात शंका नाही.

❁ ❁ ❁

# ख्रिसमस पूजा

**श्री माताजींचे प्रवचन (संक्षिप्त)**
**गणपतीपुळे २५ डिसेंबर २०००**

आजचा दिवस शुभ आहे. तो सर्वत्र साजरा होतो कारण हा इसा मसीहा खिस्तांचा जन्मदिवस आहे. त्यांच्याविषयी लोकांना खूप कमी माहिती आहे. लहानपणीच ते घराबाहेर पडले होते. त्यांनी आपल्या वयाच्या ३३ वयापर्यंत जे कार्य केले ते अतिशय महान कार्य आहे. त्यानंतर त्यांचे जे १२ शिष्यगण होते त्यांनी धर्मप्रचाराचे कार्य केले तुम्हाला जसे समस्यांना सामोरे जावे लागले तसे त्यांनाही अनेक समस्या आल्यात. पण केवळ या १२ लोकांनी पुष्कळ कार्य केले लोक त्यांना 'नॉस्टिक्स' (gnostics) म्हणतात. 'ज्ञ' जाणणे यापासून नॉस्टिक्स शब्द झाला. ते बरंच काही जाणत होते. त्यावेळच्या धर्मगुरुंनी त्यांना बरेच छळले. खिस्तांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्यात फार अडथळे येत त्यावेळी लोक आत्मसाक्षात्कारी नव्हते. खिस्त नेहमी सांगत 'स्व'ला जाणा 'स्वत:' जाणा याचे महत्व त्या शिष्यांना समजले नाही ते तसाच प्रचार करत राहिले त्यामुळे हळूहळू अधर्मच वाढत राहिला.

एकदा ते एका लग्नकार्यासाठी गेले होते. तेथे त्यांनी पाण्यात हात घालून एक पेय निर्माण केले त्याची चव द्राक्षाच्या रसासारखी होती. त्यालाच लोक मद्य समजले. म्हणून त्यांनी दारू पिण्यास सुरुवात केली लोक दारू पिऊ लागले. आम्ही इंग्लंडमध्ये होतो, तेथे सर्व कार्यक्रम ते लोक मद्य देऊ लागले, एकमेकांच्या घरी गेलात तरी मद्य पुढे करतात एवढा मद्याचा वापर होऊ लागला. या रितीला खिस्तांचा संदर्भ जोडू लागले. कुठलाही धर्मपिता असली अधर्म असणारी गोष्ट लोकांना करायला लावेल का? भारतात पूर्वी लोक कधीही मद्य घेत नसत. पण इंग्रज आले त्यांनी मद्यही येथे आणले व तेव्हापासून लोक मद्य घेऊ लागले. आता तर बरेच मद्यपी झालेत. (खिश्चन लोक मद्य घेणे म्हणजे धर्म समजतात) रोममध्ये चर्चमध्ये मद्य तयार करतात. असला अधर्म म्हणजे महापाप आहे लोक असल्या चुकीच्या गोष्टींना जवळ करू लागले. खिस्तांच्या जीवनाचा एकच उद्देश होता, आता चक्राचे भेदन करणे, त्यांनी स्वतःला क्रॉसवर चढवून घेतले व पुन्हा जिवंत प्रकट झाले. हा काही चमत्कार नाही. परमेश्वरी कार्याला कुठलाच चमत्कार नसतो.

अशारितीने त्यांनी दर्शविले की तुम्हा आज्ञाचक्राच्या बाहेर येता. आज्ञाचक्राचे दोन बीजमंत्र आहेत एक हं दुसरा क्षं. क्षं म्हणजे क्षमा. जो दुसऱ्याला क्षमा करतो, त्याचा अहंकार कमी होतो. अहंकारी माणसाला स्वत:विषयी काही दृढ समजुती असतात त्यांना धक्का पोहोचला की त्यांचा अहंकार चढतो. अपमान वाटतो त्यांची विचित्र स्थिती असते. इसा मसीहांनी सांगितले की कोणीही तुमचा अपमान केला, दु:ख दिले तर आपण त्यांना क्षमा करा त्यामुळे काय घडते पहा. जेव्हा तुम्ही क्षमा करता तेव्हा ती घटना तुम्ही विसरून जाता नंतर तुम्हाला कसलाच त्रास होत नाही. त्याबाबत पुन्हा विचारही करणार नाही. ही शक्ती तुम्हाला आज्ञाचक्रामधून मिळते. ज्यांचे आज्ञाचक्र ठीक आहे ते क्षमा करणारच क्षमा करणे हा मोठा संदेश त्यांनी आपल्याला दिला आहे.

आता दुसरा बीजमंत्र हं आहे. तो बिलकूल क्षं च्या उलट आहे. तुम्ही कोण आहात हे आधी जाणा. तुम्ही मन बुद्धी चित्त अहंकार नाही. तुम्ही 'हं' म्हणजे आत्मा आहात. आमच्या आत गर्वामुळे, अहंपणातून अज्ञानाने व मुर्खपणातून जे चुकीचे भ्रम आहेत ते सर्व व्यर्थ आहेत. त्याला काही अर्थ नाही, हे जाणणे म्हणजेच आत्मतत्व. तुम्ही शुद्ध साक्षात आत्मा आहात, अत्यंत पवित्र आहात. अशा रितीने त्यांनी या दोन गोष्टी सांगितल्या प्रथम म्हणजे क्षमा करा. ज्यांनी त्रास दिला त्यांना विसरा व क्षमा करा म्हणजे तुम्हाला त्रास होणार नाही दुसरी म्हणजे आत्मा तुम्ही आत्मा आहात, त्याला जाणा, ज्याला कोणी शिवू शकत नाही, त्रास देऊ शकत नाही त्याच्याशी रममाण व्हा. आत्म्याला जाणण्यासाठी तुम्हाला कुंडलिनीच्या जाग्रणाची आवश्यकता आहे. कुंडलिनी जाग्रणानंतरही तुम्ही त्यात स्थिझ व्हायला पाहिजे. आतून स्थिझ व्हायला पाहिजे म्हणजे आतून तुम्ही एकदम शांत होता, विचलित होत नाही. ज्या छोट्या छोट्या गोष्टींचा तुम्हाला त्रास होत होता ते सर्व नष्ट होते, तुम्ही आत्म्याचा आनंद घेऊ लागता. यासाठी कुंडलिनीच्या जाग्रणाची आवश्यकता आहे जाग्रणानंतरही लोक भटकत राहतात.

विचारात गुंततात. पण जेव्हा तुम्ही आज्ञा चक्राच्यावर जाता तेव्हा हे सर्व संपते. याबद्दल बायबलमध्येही लिहिलेले आहे म्हणूनच आज्ञा चक्राचे महत्व आहे, जो कपाळावर टिळा लावून येईल ते बचावेल असे म्हटले आहे. असे लोक म्हणजे सहजयोगीशिवाय कोण असेल?

कार्य प्रचंड आहे. ते बारा लोक होते. आपण तर हजारो आहात. एकेकाने जे कार्य केले त्याच्या एक सहस्रांश सुद्धा तुम्ही करू शकला नाही. आपण सर्वांनी माझ्या कार्यात हातभार लावून सर्व विश्वात त्याचा प्रचार करावा.

## इंग्रजी भाषणाचा अनुवाद

मी जेव्हा परदेशात असते तेव्हा नेहमी इंग्रजीतूनच बोलते. येथे बरेच लोक हिंदी जाणतात म्हणून येथे बदल म्हणून हिंदीतून बोलते. मी लोकांना खिस्तांच्या महान अवताराबद्दल सांगितले. ते एका महान कार्याकरिता आले ते म्हणजे त्यांना लोकांचे आज्ञाचक्र उघडायचे होते. फार महान कार्य होते त्याकरिता त्यांनी मोठा त्याग केला. क्रॉसवर चढले. या घडणाऱ्या घटनांची त्यांना आधी कल्पना होतीच कारण ते परमेश्वरी व्यक्तीत्व होते. सर्व त्याग करण्यात त्यांना कसलीच अडचण नव्हती, हे करण्यात. त्यांना वाटले दुसरा कोणता तरी मार्गाने लोकांचे आज्ञा चक्र उघडेल. पण त्यांना जीवनाचा त्याग करावा लागला. या त्यागातून त्यांना हे दाखवायचे होते की आपल्या क्षुद्र व उथळ जीवनातून वर यायचे असेल तर त्यागाची आवश्यकता आहे. त्याग पण कशाचा? आपल्यातील षड्रिपुंचा. पण कुंडलिनी जागृणाने तुम्ही आपोआप या षड्रिपुंच्या तावडीतून मुक्त होता. (Detached) ते तुमच्यातील कुंडलिनीच्या शक्तीवर अवलंबून आहे. जर तिचे उत्थापन व्यवस्थित झाले तर लोक एका घटकेत आत्मसाक्षात्कारी झालेले पाहिले, असे थोडे लोक आहेत. बरेच लोक मी पाहिले ते समस्येतच अडकतात. विशेषतः आज्ञा चक्रांच्या. लोकांना एक सवयच होते की प्रतीक्रिया दर्शविणे. काही घडले की प्रतिक्रिया होणे, कुठल्याही बाबतीत. हे सर्व तुमच्यातील सवयीमुळे (Conditioning) किंवा अहंकारातून (Ego) होते. स्वतःच्या अहंकारामुळे आपण कोणीतरी विशेष वा उच्च आहोत असे सतत वाटते आणि कोणी काही बोलले की लगेच त्यांना सलते. हे सर्व अहंकारामुळे घडते. अहंकार हा तुमच्या आज्ञाचक्राचाच भाग आहे व दुसरा (Conditioning) पूर्वग्रह. ज्यांना सतत दुसऱ्याकडून मान घेण्याची सवय असते व एखाद्याने चुकून दुर्लक्ष केले की त्यांचा पारा चढतो. अशा अनेक क्रिया प्रतिक्रीया हे सर्व नष्ट करण्याकरिता खिस्तांनी आपल्या जीवनाचा त्याग केला. ते ईश्वरी व्यक्तीत्व होते. ते व्यक्तीत्व सागरासारखे आहे. जे शून्यस्तरांत असते. सागरामुळे ढग निर्माण होऊन पाऊस पडतो व नद्या भरून वाहू लागल्या की पुन्हा समुद्राला येऊन मिळतात. असे व्यक्तीत्व. अगदी सर्वांच्या खाली म्हणजे नम्रता. नम्रता असणे हा एक सहजयोग्यांचा गुण आहे. जे नम्र नाहीत ते सहजयोगी नाहीत. काही लोक पाहिलेत ते रागावतात, ओरडू लागता? हे सहजयोगी असूच शकत नाही. अशी नम्रता तुम्हांला स्थिरता पक्केपणा देऊ शकते मग तुम्ही प्रतिक्रिया व्यक्त करत नाही. नुसते पहात राहता. अशा रितीने तुम्ही 'साक्षीत्व' मिळवता.

साक्षीत्ववृत्तीमुळे तुम्ही सृष्टीकडे पहाता पण विचार करत नाही. त्याची मजा घेता, मग त्यातून तुम्हाला आनंद मिळतो. यातून तुमच्या व्यक्तीमत्वातला आनंद प्रत्ययास येतो. आजच्या लोकांची समस्या हीच की प्रतिक्रिया दाखविणे, कोणती घटना घडू द्या वर्तमान पत्र उघडू द्या, लगेच प्रतिक्रिया बाहेर पडते. हे रोजच्या जीवनात घडते. प्रतिक्रियेतून काहीच निष्पन्न होत नाही. जर त्यातून काही घ्यायचे असेल तर तुम्ही साक्षीत्वच्या स्थितीत असणे जरुर आहे हीच आपल्याला खिस्तांच्या जीवन त्यागातून शिकवण आहे. त्यांचा जन्म हाच अत्यंत हलाखीत, गरीब परिस्थितीत प्रतिकूल वातावरणात झाला. यातून हेच जाणायचे उथळ गोष्टी पोकळ भौतिकतेमुळे माणूस मोठा होत नाही. मोठेपणा आतून असावयास हवा. त्यावेळेस तुम्ही त्याचा विचारही करत नाही, कशाचीच तमा बाळगत नाही. त्यामुळेच तुमचे जीवन उज्वल होते. याप्रमाणे त्यांचे जीवन होते. त्यांना आपल्यातील श्रीमंतीचा वा गरिबीचा, कुठल्याही पदाचा व सत्तेचा विचार नव्हता. कारण ते ईश्वरी व्यक्तीत्व होते. सुरवातीला लोक जेव्हा गणपती पुळ्याला येत तेव्हा इथल्या गैरसोयीबद्दल कुरकुरत आता तसे नाही. इथे तुम्ही आपले 'साक्षीत्व' वाढवण्यासाठी येता. इथल्या सुंदर आकाशाकडे पहा. त्यांच्या रंगछटा पहा. नुसते बघत रहा. त्याची मजा घ्या. अशा आध्यात्मिक स्थितीत तुम्ही असता तेव्हा तुम्ही आनंदात, शांतीच्या स्थितीत करुणामय असता. या गोष्टींना तुम्ही केवळ आपल्या अहंकारामुळे मुकता. तो तुमचा मोठा शत्रू आहे. जो तुमच्या जीवनातील संपन्नता व आनंदाला अडथळा उभा करतो. त्याच्याकडे तुम्ही बघत रहा. त्याचे खेळ पहा पण त्यापासून अलग रहा साक्षीरुप रहा मग त्यांचे खेळ आपोआप संपतील. आजच्या युगाची अहंकार हीच मोठी समस्या आहे. सर्व राष्ट्रांच्या जगाच्या समस्या यामुळेच

आहेत. लोकांना त्याची उलट मजा वाटते. सहजयोगातही ही एक समस्या आहे. लोकांच्या अहंकाराबाबत कसे सांगावे? पण ही समस्या तुम्ही सहजयोगीच हाताळू शकता. एक माझे व तुमचे प्रश्न सोडविण्याचा उत्तम उपाय आहे.

माझ्या जीवनाचे एक भव्य चित्र माझ्यासमोर आहे. सर्व विश्वाला आत्मसाक्षात्कार मिळाला पाहिजे. तसा तुम्ही सर्वांनी निश्चय करा. त्याबाबत आपले आत्मपरीक्षण करा. या जगासमोर मी कोण आहे? सहजयोगात जे शिकायला मिळते सहजयोगी जे आत्मनिरीक्षण करू शकतील ते दुसऱ्यांना शक्य नाही. हा मिस्टर इगो कोण आहे? त्यासाठी तुम्ही अत्यंत नम्रतेने श्री ख्रिस्तांचा मंत्र म्हणा, त्याची तुम्हाला मदत होईल. लोकांच्या स्तुतीला तुम्ही बळी पडू नका. बाहेरच्या जगात जे अहंकाराचे, स्पर्धाचे जे घाणेरडे साम्राज्य पसरले त्याला सामोरे जा. हे अहंकार दूर करण्याचे यश तुम्ही मिळवा, ते परम आहे. तुमचे नम्र स्वभावाचे दर्शन कायम राहील. स्वार्थी लोकांना या जगांत कोण विचारते! लोकांनी तसे घडावे असे वाटते तर तुम्हीपण तसे आदर्श व्हा. हे जाणून तुम्ही ख्रिस्तांच्या अवताराला, जीवनाला पूर्ण न्याय दिल्यासारखे होईल. त्यांनी ज्या तऱ्हेने अहंकाराला पार केले तो एक उत्तम आदर्श आहे. जगात काही राष्ट्रे ख्रिस्तांचा अभिमान बाळगतात. तेच स्वतःला मोठे अहंकारी, गर्विष्ट समजतात हे विचित्र वाटते. अशा लोकांनी नम्रता, करुणा यांचे दर्शन घडवावे, त्याचा अंगिकार करावा. म्हणून विशेषतः पाश्चात्यांनी सहजसंस्कृतीचा अंगिकार करावा तुम्ही तसे व्हाल व मग लोकांना तुमचा हेवा वाटेल. तुम्हाला मी ख्रिसमसच्या शुभेच्छा देते. ख्रिस्तांच्या जीवनाचा आदर्श जाणून घ्या.

ईश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

●●●

# गणपतीपुळे विवाहप्रसंगी दि. २९.१२.२००० रोजी प. पू. श्री माताजी निर्मला देवींनी केलेला उपदेश

तुम्हा सर्वांनी सहजयोगात विवाहबद्ध होण्यासाठी केलेल्या निश्चयाबद्दल, सर्वांचे अभिनंदन. इतरत्र होणाऱ्या विवाहापेक्षा सहजयोगात तुम्ही लग्न करता, त्यामुळे तुमच्यावर विशेष जबाबदारी आहे. सहजयोगिनी म्हणून तुमची वागणूकही 'सहज' पद्धतीने असावी हे महत्वाचे आहे कारण, या विवाहबंधनातून उत्तम कुटुंबसंस्था निर्माण होणे जरूर आहे. जगात आजकाल कुटुंबसंस्थेला तडा जात आहे. स्त्रीची जबाबदारी आहे की या कुटुंबसंस्थेला सुरक्षित ठेवणे व पर्यायाने समाजाला वाचवणे कारण या बंधनातून निर्माण होणारी मुले 'सहज' समंजस प्रेमळ व कनवाळू असावीत. स्त्रीने सतत काही मागण्याऐवजी तिने देत रहाणे महत्त्वाचे आहे. सतत मागत राहण्यापेक्षा तिने आपल्या पतीकडे लक्ष द्यावे, त्याच्याशी प्रेमळपणे राहून त्याच्या सर्व गरजांकडे लक्ष द्यावे. त्यांचा आदर राखला पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाही. त्याला सतत आधार दिला पाहिजे. लोकासमोर त्याच्याविरुद्ध बोलू नये. वागण्यात दोघांनी एकमेकांशी सुसंवाद साधला पाहिजे. कामावरून आलेल्या पतीचा जर मूड ठिक नसेल तर त्याबाबत काळजी घेऊन नीट सांभाळावे. कुटुंबातील सुख व शांती ठेवणे ही तिची जबाबदारी आहे. तुम्ही सर्व काही सूज्ञतेने समर्थपणे हाताळले पाहिजे; व्यवस्थितपणे. त्यांना तुम्ही अधिपत्य गाजवता असे न करता सर्व काही गोडीत झाले पाहिजे. त्यांच्याकडून जास्त अपेक्षा न ठेवता, त्यांना अपेक्षित प्रेम व ममतेने सर्व सांभाळले पाहिजे, ज्याची त्यांना अपेक्षा आहे. मग तेही तुमची काळजी घेतील. हे सर्व सांभाळले तर तुमचे विवाह यशस्वी ठरतील, कारण तुम्ही सहजयोगिनी आहात. तुमची मुलेही सुंदर सहजयोगी बनतील.

माझे अनंत आशीर्वाद.

●●●

# कळवा पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे प्रवचन (संक्षिप्त)

### दि. ३१ डिसेंबर, २०००

### इंग्रजी भाषणाचा अनुवाद

आता नवीन वर्षाची सुरुवात होत आहे. मी तुम्हा सर्वांना हे वर्ष सुखदायी व भरभराटीचे जावो अशा शुभेच्छा देत आहे. ह्या माझ्या शुभेच्छेबरोबर तुम्हा सर्वांची सहजयोगांत गहन प्रगती व्हावी अशी माझी इच्छा आहे. तुम्ही सर्वजण सहजयोगी आहात आणि तुम्ही सर्व सहजयोगात प्रणेते म्हणून उभे रहा. हे घडण्यासाठी तुम्ही ध्यानधारणा, आत्मपरीक्षण, सहजयोगातील इतर साधना तुम्ही करत असाल. येत्या वर्षात सहजयोग वाढविण्याची मोठी संधी आहे. कारण आतापर्यंत येणारे सर्व अडथळे दूर झालेत असे वाटते. आपण नवीन युगात प्रवेश करत आहो. सत्य युगाची मुहुर्तमेढ झालेली आहे. कारण कलियुगाचे ढग निघून गेलेत, तुमच्या आध्यात्मिक, राष्ट्रीय व कौटुंबिक जीवनात धोके निर्माण करणारे लोक आत मागे हटले आहेत, ते अयशस्वी ठरलेत. आता तुम्हां सर्वांना ठरवायचे आहे की सहजयोग किती वाढवायचा? किती लोकांना सहजयोग द्यायचा, या वर्षात बरेच लोक सहजयोगात उतरण्याची वाट बघत आहेत. आणि तुम्ही ठरवले तर सर्व काही घडून येईल व बरेच या. कलियुगाच्या शत्रूपासून वाचतील. तुम्ही या नवीन वर्षासाठी आज निश्चिय केला पाहिजे की आम्ही नवीन तऱ्हेने सहजयोग वाढवू, मोठ्या प्रमाणात व अती कुशलतेने वाढवू.

यासाठी प्रथम तुमची संघशक्ती महत्त्वाची आहे, 'तुमची सामुहिकता' जी भक्कम, पूर्ण बांधलेली, पूर्ण जाणून घेतलेली प्रेमपूर्ण असावी. सहजयोगात हे अवघड नाही. तुमच्या उथळ कल्पना, हेवेदावे सर्व कुंडलिनीद्वारे संपलेले आहेत. तुमच्यात परिवर्तन झालेले आहे. तुम्ही स्वतःला समजून घेतले आहे, 'स्व'ला समजला तर एकमेकात भांडणे कशी असतील. तुमच्यात एकच शक्ती एकच देवता तुमच्या सर्वांच्या हृदयात वास करत असताना तुम्ही एकमेकांशी कसे संघर्ष करता, म्हणजेच तुम्ही स्वतःशीच भांडता, तसे करत बसणे म्हणजे मूर्खपणाचे असेल. पण हे सर्व संपून तुम्ही तुमचे व्यक्तीत्व अधिक प्रफुल्लीत, संघटीत व प्रगतीपथावर असेल. ते तुमच्यातून प्रतीत होईल व अनेक सहजयोगी निर्माण करू शकाल. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला, त्याचे ज्ञान मिळाले. तुमचे आरोग्य सुधारले व संपन्नता आली. तर आता तुमचे कर्तव्य आहे परतफेडीचे. तुम्ही तुमच्या सृजनशीलतेने, नावीन्याने तुम्ही कृतीशल व्हा. जगांत लोकांच्यासमोर भरपूर समस्या आहेत. ज्यातून तुम्ही बाहेर पडला आहात, अशा लोकांना हात द्या. त्यासाठी तुम्हाला शक्ती दिली आहे. ती स्वतःपुरती न ठेवता दुसऱ्यासाठीही वापरा. नाहीतर त्या शक्तीचा काय उपयोग. वीज दिव्याकरिता वापरली नाहीतर तर तिचा काय उपयोग? तुम्ही लोकांची कुंडलिनी चढवा. एक व्यक्ती हजारोंना पार करू शकेल. ही जबाबदारी तुम्ही स्वतःवर घ्याल अशी आशा आहे. हा तुम्हाला सहजयोगाचा मोठा आशिर्वाद आहे, ज्यामुळे तुम्हाला सर्व विश्वाला बदलायचे, हे माझ्या जीवनाचे सुंदर स्वप्न आहे. माझ्या हयातीत हे घडेल किंवा काय मला माहीत नाही. पण तुम्ही सर्वांनी माझ्या या कार्याला श्रद्धेने हातभार लावला तर ते अशक्य वाटत नाही.

मी असे ऐकले पुष्कळ लोक ध्यानाला जात नाहीत. सामूहिक ध्यानाला ते बसत नाहीत. हे बघून आश्चर्य वाटते. एवढ्या ३० वर्षाच्या माझ्या परिश्रमानंतरही हे चालू आहे. काही लोक सहजयोगात हे चालते असे समजतात त्यांना त्यांची जबाबदारी कळली नाही असे वाटते. सर्वांनी सामूहिक ध्यानात बसले पाहिजे. तुमच्या परिसरात असे सामूहिक ध्यान सुरू करू शकता. कोण लोक ध्यान करतात, कोण करत नाही हे मला सहज कळू शकते. मग ते लोक स्वतःविषयी, वडिलांच्या आईच्या काकांच्या इ. समस्या घेऊन येतात. त्याची चिंता

करण्याची जरुर नाही. जर तुम्ही पार झालेले आहात आणि तुम्ही परमेश्वराशी एकाकार असाल तर तुमच्या सर्व इच्छा फलद्रूप होतात. पण असे होत नाही. याचे कारण तुम्ही स्वतःला जाणले नाही. तुम्ही दुसऱ्यांना आत्मसाक्षात्कार देण्याचा प्रयत्न करा आणि पहा की त्यातून किती आनंद मिळतो जो इतर कशानेही प्राप्त होत नाही. त्यातून तुम्हाला काही मिळवायचे नसते. निरपेक्षतेने करता हाच शुद्ध आनंद आहे समाधान देणारा शुद्ध आनंद. नवीन सहजयोगी निर्माण करण्यातला. ह्याचीची अपेक्षा तुमच्याकडून या देवतेची आहे. स्वतःच्याच व आपल्या समस्येत न अडकता त्यातून वर या उन्नत व्हा, मग तुम्ही शक्तीमान होता. जोपर्यंत तुम्ही स्वतःची ही शक्ती वापरत नाही तर मग तुम्ही स्वतःला शक्तीपूर्ण आहात कसे समजेल? हे सरळ आहे. ज्यांनी ही शक्ती वापरली त्याबद्दल ते सांगतात काय चमत्कार घडतात, – हे प्राप्त झाले, आम्हाला संरक्षण कसे मिळते इ. सहजयोगांत दांभिकतेला स्थान नाही. असे कोण वागतील तर सहजयोग्यांना, देवतेला सर्व समजते. आपल्या स्वतःकरिता, स्वतःच्या उन्नतीसाठी सहजयोग आहे. बरेच सहजयोगी आहेत जे बरे झाले आहेत. पण त्यांनी ध्यान केले पाहिजे ते पण सामूहिकतेत पण काही लोक सामूहिकतेत येत नाहीत. पण सामूहिकतेत तुम्हाला देवतेचे आशिर्वाद मिळतात, चैतन्य प्रवाहात तुम्ही असता. पण सामूहिकतेत तुम्हांला देवतेचे आशिर्वाद मिळतात, चैतन्य प्रवाहात तुम्ही असता. पण सहजयोग्यांना त्यांची जबाबदारी समजत नाही. त्यात तुम्ही वाढता, लोकांना आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे, ध्यानांच्या सर्व कार्यक्रमाला हजर असले पाहिजे मग तुम्ही स्वस्थ राहता. सर्व समस्या सुटतात याबद्दल मी खात्री देते. मला लिहून मला भेटून काय मिळणार.

येणारे वर्ष हे फार महत्त्वाचे आहे. परदेशात प्रसार झपाट्याने पसरत आहे. रशियामध्ये लोक गहनतेत उतरले आहेत. एकदा त्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला की त्यांची किंमत त्यांना कळते. ते अतिशय नम्र आहेत, गहन आहेत. कशाचीही अपेक्षा ठेवत नाही. जरी त्यांच्यापुढे कम्युनिझम सारख्या गंभीर समस्या आहेत तरी ते गहनतेत उतरलेले आहेत सहजयोगाला पूर्ण समजून घेतले आहे. त्यातील काही शास्त्रज्ञांनी जे भारतात आले, त्यांनी चक्रांची स्थिती, त्यावरील अडथळे व त्यांची शक्ती याबाबत अशी पद्धत शोधून काढली की ते तुम्हाला सर्व स्पष्ट दाखवते. पण येथील शास्त्रज्ञ मला विरोध करतात. अर्धवट ज्ञान फार धोक्याचे असते. ते व्यवस्थितपणे माझे कार्य काय कसे चालते हे समजूनच घेत नाही. केवळ टीका करणेच माहित आहे. बुद्धिमंत म्हणणारेही तसेच आहेत, विशेषतः महाराष्ट्रातले. महाराष्ट्रातील लोक सकाळी उठतील पूजा करतील सर्व करतील पण मग त्रास झाला, मला लिहून पाठवतील. सगळे परंपरेत अडकलेले आहेत. खरे सहजयोगी असतात, त्यांना कधी कसलाच त्रास होऊ शकत नाही. पण तुम्ही चुकीच्या समजुतीत असता. तुम्ही सर्व कर्मकाडात असता तुमचे भांडे रिकामे नसेल आधीच भरलेले असेल तर परमेश्वर त्यात काय घालणार, जागाच नाही. तुम्ही स्वतः पोकळ व्हा. मन रिक्त करा. सहजयोगात हे जमते जेव्हा तुम्ही तुमची कुंडलिनी आज्ञा चक्राच्या वर येते. म्हणजेच तुम्ही तुमच्या प्रतिक्रिया थांबवता. तुमच्या प्रतिक्रिया घातक असून त्या तुमच्या अहंकारातून वा पूर्वग्रहातून येतात. तर प्रतिक्रियात न अडकता सृष्टीकडे पहात रहा. रंगीबेरंगी फुलाकडे पहात रहा. ईश्वराच्या भव्य निर्मितीकडे बघा. प्रतिक्रियांना विसरा. मग तुम्ही खरे सहजयोगी बनता. सहजयोग्यांच्या स्थितीचे सहजयोगात विविध स्तर पहाण्यात येतात. पण त्याची स्थिती तो ज्या समाधानात, ज्या आनंदात असतो त्यावरून कळू शकते. सर्वावर रागावणे व टीकाही केली जाते तरी ते स्वतःला सहजयोगी म्हणवतात या ईश्वरी विश्वविद्यालयात तुम्हाला पदवीची जरुरी नाही प्रमाणपत्रांची जरुरी नाही. एकदा तुम्ही पार झालात की तुम्ही सहजयोगी होता. पण खरा सहजयोगी तो जो नेहमी आनंदात असते आणि दुसऱ्याला आत्मसाक्षात्कार द्यावा. याचीच त्याला रुखरुख असते. तो तुम्ही स्वतःपुरता ठेवावा अशी जर तुमची धारणा असेल तर तुम्ही खरे सहजयोगी नाहीत. येणारे वर्ष हे फार महत्वाचे आहे. सर्वांनी भ्रमण करत नवीन लोकांना पार करण्याचे कष्ट घ्या. बाहेर बघितले तर अनेक अगुरुंचा सुळसुळाट दिसतो. त्यांचा प्रचारही त्यांचे लोक करतात अगदी त्यांची लायकी का नसेना? सगळे विनदिक्कत चालू आहे. पण सहजयोग्यांनी तोंड उघडले पाहिजे. शेजाऱ्यांना सहजयोग सांगा, आपल्या भोवतालच्या लोकांना सांगा. आपल्या हिंदुस्थानात अनेक चालीरिती दिसतात. त्यासाठी अनेक लोकांची जरुरी आहे. जसा महाराष्ट्रात

हळदीकुंकाचा स्त्रिया कार्यक्रम करतात, त्यावेळी माझा फोटोसुद्धा ठेवत नाही सहजयोगाबद्दल बोलत नाही, कशाला भितात? समजत नाही. मग सहजयोग कसा वाढेल, सहजयोगात आल्यावर आपली जबाबदारी ओळखा, अर्थात तुम्हाला संरक्षण आहे आशिर्वाद आहेत, पुष्कळांना अनेक लाभ झालेले आहेत. ज्याची कितीजण परतफेड करतात. लोकांना आत्मसाक्षात्कार देणे तुमच्यावरचे ते ऋण फेडायचे आहे. पण तुमचे लक्ष ठिकाणावर नसते, ते शुद्ध व निर्मळ नसते. अनेक ठिकाणी गुंतलेले असते. (Attached) भरकटलेले असते. तुम्ही फक्त सहजयोगाशीच बांधील आहात आणि 'स्व'ला ओळखला. स्वतःची पात्रता ओळखा मग मला वाटते आपण सर्व जगात परिवर्तन घडवू. आपली संस्कृती संपन्न आहे. आपला मोठा ठेवा आहे. बाहेरच्या अमेरिकेसारख्या देशात ज्या समस्या आहेत तशा आपल्याकडे नाहीत. तर सतत लक्षांत ठेवले पाहिजे की मी सहजयोगी आहे. झाडाकडे पहा ते कसे वाढते अनेक गोष्टींचा त्यात सहभाग असतो, असेच नुसते वाटत नाही. तर सहजयोग्यांनी आपले चित्त भरकटू न देता त्यात वेळ वाया न घालवता ध्यानाकडे दुर्लक्ष न करता, आपल्या उन्नतीकडे लक्ष द्यावे. तुम्ही साक्षात्कारी आहात. शक्तीमान आहात. पूर्वी असे फार थोडे लोक होते. पण तुम्ही अनेक आहात. स्त्रियांनीही पुढे आले पाहिजे माझ्याकडे पहा, मी एकटीने किती घडविले. तसे अवघड नाही, तर सहजयोगाच्या कार्यात उतरा तो वाढवा. ते सर्व मानवांना उपकारक आहे. तुमची दया, प्रेम हे वाया जाऊ नये, तर कशात गुंतू नका, तुम्ही आता विश्वाच्या पातळीवर आहात. तुम्ही सर्व विधाशी निगडीत आहा, एकट्यापुरते नव्हे. मी म्हणेल थेंबाला सागराचे स्वरूप आले. स्वतःला सागराशी तुलना करून पहा. तो सर्वांच्या खालच्या पातळीवर असतो, शून्य स्तरावर (Zero level). तो ढग निर्माण करतो, त्यातून पाऊस मिळतो. नद्या वाहत पुन्हा त्या सागराला येऊन मिळतात. तरी तो किती नम्र असतो. जे सहजयोगी विनम्र आहेत ते अधिक लोकांना आकर्षित करतात. तरी पोकळ अभिमान न ठेवता तुम्ही बदलले पाहिजे. तुम्ही दयाळू विनम्र उदार समाधानी असला पाहिजे. तुम्ही सहजयोगी तुमच्याच समस्येचे रडगाणे गात बसाल तर इतर सहजयोगी हसतील. तुम्ही सहजयोग व्यवस्थितपणे कराल तर कोणी आजारी होणार नाही, कसलाही त्रास होणार नाही, हे सत्य आहे. तुमच्यामुळे इतरांचा उद्धार होऊ शकेल हे समजून घ्या. इतर बाहेरच्या वा नातेवाईकांच्याबरोबर गुंतू नका. तुमच्यातील परिवर्तनाकडे बघून त्यांच्यावर काही परिणाम होणार नसेल तर काय फायदा? सहजयोग सांगूनही त्यांना काय कळणार, अशा लोकांपासून दूर रहा.

आपली सहजयोग कुटुंबसंस्था फार मोठी आहे. जवळजवळ ८४ देशांत सहजयोग पसरला. समुद्रासारखा अथांग आहे. त्यांची संख्या अधिकाधिक वाढावी, त्याचा विस्तार घडावा ही तुम्हा सर्व सहजयोग्यांची जबाबदारी आहे. तुम्ही नियमित ध्यान करा. जास्तीतजास्त सामूहिक कार्यक्रमांना हजर रहा. तुम्ही सर्वजण येथे आलात, येथे राहिलात, अजूनही येथे राहून तुम्ही ईश्वराच्या कृपेचा आनंद घेत आहात, हे पाहून मला आनंद वाटतो. तुमची शुद्ध इच्छा आहे 'कुंडलिनी' शुद्ध इच्छा म्हणजेच Pure desire म्हणजे सहजयोगी होणे ही नसून सहजयोगी निर्माण करणे होय. तुम्ही कदाचित ते ओळखले नसेल. ही शुद्ध इच्छा सफल झाल्याशिवाय तुम्ही पूर्ण सहजयोगी होऊ शकत नाही. सर्व भागात, सर्वांना सहजयोग द्या. तो निश्चितच वाढेल. जे लोक चुकीच्या मार्गावर आहेत खोट्या मायेत अडकले आहेत, त्यांना सहजयोगात आणा. वर्तमानपत्रातील समस्या पाहिल्या तर वाटते हे लोक सहजयोगी असते तर किती बरे झाले असते. यातून किती चांगले घडेल याचा विचार करा. माझ्यामुळे एवढे सहजयोगी निर्माण होऊ शकतात. तर तुम्ही का करू शकत नाही? सर्व जग वाचल. तुम्ही तुमच्या खाजगी जीवनात काय करावे हे येथे मला सांगायचे नाही. पण तुम्ही स्वतःला पूर्ण शुद्ध व सुंदर ठेवले पाहिजे, आपण काय केले पाहिजे काही लोक अजूनही फार उथळ आहेत त्यांचा विचारच करू नका. त्यांना विसरा. पण बाहेर जवळजवळ ८० टक्के लोक आजाराने ग्रासलेले आहेत त्यांना मदतीचा हात द्या हीच एक तुमच्या आईची ईच्छा आहे. जो जो भेटेल त्याला सहजयोगाला कमीपणा न आणता, सांगत जा, ही जबाबदारी तुमच्या स्वतःवर घ्यावी.

ooo

# कळवा पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे प्रवचन (संक्षिप्त)

### दि. ३१ डिसेंबर २०००

### मराठीतील प्रवचन (संक्षिप्त)

महाराष्ट्रात कर्मकांड फार विशेषतः महाराष्ट्रातील स्त्रियांना सर्व सण पाठ. त्या सर्व सण व्यवस्थित साजरे करतात, फार कर्मकांड करतात. तिकडे दिल्लीला बरे, तिकडे कसलेच कर्मकांड नाही, तिथे लाखोंनी लोक पार झालेत. महाराष्ट्रात लोक पंढरीची वारी करतात, तेथे टाळ वाजवत जातात. पंढरपूरला गेलेले लोक कधीच पार होत नाहीत. लोक डोक्यावर कळशी तुळशिचे रोप घेऊन आळंदीला जातात. वाटेर फुकट जेवण मिळत असते ते घेतात. हे काय ज्ञानेश्वरांनी सांगितले? ते अनवाणी फिरले आणि आता लोक त्यांच्या पालख्या काढतात. त्यांना काय स्वतःची इज्जत नाही वाटत ज्ञानेश्वरांच्या नावावर भिका मागायला? त्यांना जेवायला घालणारे लोक स्वतःला धन्य मानतात. अशा लोकांना देऊन तुम्हाला काय मिळणार? असे पुष्कळसे काही महाराष्ट्रात चालू आहे ते आता बंद केले पाहिजे. याबद्दल कुठल्या शास्त्रात लिहिले? हे काही ज्ञानदेवांनी लिहलंय का? हे सर्व सुटायला पाहिजे. आता हळदी कुंकू करता, त्यावेळी त्यांना सहजयोगाबद्दल सांगायला पाहिजे. ओट्या भरून काय प्राप्त होणार? हे सर्व आता संपवा. तुमच्या आत एवढी संपदा आहे तिला मिळवा. येथे एवढे साधुसंत झालेत. त्यांनी काय शिकविले ते पहा. आधी प्रथम सर्व कर्मकांड बंद करा. जुन्या चालिरितीत बंद करा. आता सर्वांनी हळदीकुंकवाला सहजयोग सांगणाऱ्यांकडे जा. ज्यानीत्यानी इतरांना सहजयोग सांगा.

महाराष्ट्रात दोन तऱ्हेचे लोक दिसतात. एक कर्मकांड करणारे दुसरे बुद्धीवादी. निर्बुद्ध म्हणजे बुद्धिवादी. बुद्धीवादींच्या डोक्यात सहजयोग घुसत नाही. बुद्धी एवढे शिक्षण नाही. मी एवढी मेहनत घेऊन सुद्धा फार प्रगती झाली नाही. याला कारण काय! त्यासाठी कर्मकांडीपणा सोडला पाहिजे. त्याची गरजच नाही. लोकांनी वापरता कामा नये. फार बुद्धी वापरता कामा नये. जी तुम्हाला चुकीच्या मार्गावर नेते, तिचा उपयोग काय? महाराष्ट्रात हे जे बुद्धिवादी लोक आहेत ते कर्मकांडांत अडकलेले, भरकटलेले, बहकलेले लोक आहेत. कारण त्यांना अहंकार फार असतो. अशा त्यांच्या विचित्र कल्पना, त्यांच्या या बुद्धिवादाला काही अंत नाही. समजून घ्यायचे नाही, ऐकायचे नाही त्यातून ते कसे सगळीकडे आत्मसात होणार? बुद्धिवादाचे पेवच फुटले आहे पुस्तकावर पुस्तके लिहितात, पण त्यांना काय अनुभव आहे? तुम्ही लोकांनी ठासून सांगायला हवे 'आम्हाला हे पटत नाही. सर्व फालतूच्या गोष्टी. प्रत्येकावर टीका करायची, रामावर कृष्णावर टीका करायची संतावर टीका करायची. ही काय श्रद्धा आहे? ज्यांना स्वतःवरच श्रद्धा नाही ते कसे सहजयोगात येणार? स्वतःवर श्रद्धा असलेले लोक शोधून काढा त्यांना मदत करा. भांडणे राजकारण विसरा, सहजयोगात असे कितीतरी लोक पूर्ण हिय्या करून सहजयोगाच्या कार्यात उतरतील. लीडरचे खुसपट काढणे, माझी आजी आजारी आहे तीला ठिक करा हेच ऐकायला मिळते. माझे काय? तुम्ही विश्वाच्या पातळीवर आहात. सर्व जग तुमचे आहे? माझी आई तुझी आई याला काय अर्थ? सर्व जग तुमचे आहे. संतांनी असे केले का? त्यांच्या ओव्या म्हणता पण त्याचा अर्थ समजून घेता का?

तेव्हा हे सर्व सोडून प्रत्येकाने स्वतःबद्दल इमानदार असले पाहिजे. मी स्वतःसाठी काय करतो? मला काय केले पाहिजे? मी तर सहजयोगी आहे. पूर्वी एवढे कधी सहजयोगी होते का? जे दोन चार होते त्यांना एवढ्या छळानंतरही त्यांनी किती सुंदर कविता लिहून ठेवल्या आहे. तुम्ही ज्या देशात रहाता त्याचे नावच महाराष्ट्र आहे. मग बेडकासारखे तुम्ही लहान कसे असणार? आता नातलग सोडा, आता सहजयोगी हेचि सोयरे होती. तुमचे सोयरे दुसरे कोणी नाही. सर्व पसायदान पाठ. पुढे पाठ मागे सपाट. तेव्हा महाराष्ट्रीयांनी स्वतःकडे विनोदी बुद्धीने बघायला हवे. की मी करतो काय? माझे कार्य काय? दिल्लीत २/३ महाराष्ट्रीयन आहेत ते बघा कसे कार्य करतात. आता तुम्ही सहजयोगात मेहनत घेतली पाहिजे. मी कोण आहे? मी कशासाठी आहे? मी कुठे चाललोय? याबाबत आत्मपरिक्षण करा. आपणा सर्वांना अनंत आशिर्वाद.

# भारत गणतंत्र दिवस २६ जानेवारी २००१

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींनी केलेल्या भाषणाचा सारांश
## प्रतिष्ठान पुणे दि. २६ जानेवारी २००१



आपल्या देशाकडे पाहिले तर सगळीकडे एक प्रकारचे नैराश्य पसरलेले दिसते. देशबंधुत्व, देशाविषयी आस्था कुठेच दिसत नाही कारण आपले चित्तच देशावर नसते. त्यासाठी आपल्या जन्मभूमीवर, आपल्या देशावर प्रेम हवे. आम्ही देशासाठी काय केले पाहिजे, आम्ही काय देऊ शकतो, देशाची स्थिती कशी सुधारेल याचा विचार हवा. पण आपले चित्त बाह्यातच फार असते. तिकडे इंग्लंडमध्ये आपल्या देशाबद्दल पूर्णपणे कुठल्या कोपऱ्यात काय चालते याबद्दल बहुतेकांना माहिती असते. तसेच अमेरिकेतील मुलांनाही सर्व देशांबद्दल पूर्ण माहिती असते. आपल्याकडे त्याबाबत तशी व्यवस्था नाही. शाळेतही तशी सोय नाही. याबाबत प्रथम मुलांच्या आईवडिलांनी जागृत असायला हवे. आपल्या देशासाठी होणाऱ्या कार्याविषयी जागृत असायला हवे. सर्वांना देशाविषयी ज्ञान असायला हवे. याविषयी बाहेरचे सहजयोगींना विशेष ज्ञान आहे. देशात आल्यावर या भूमीला ते वंदन करतात. महाराष्ट्रातील संताबद्दल सर्व माहिती आहे. सर्व संतांनी सहजयोगच सांगितलेला आहे. फक्त ते लोकांना आत्मसाक्षात्कार देऊ शकले नाही. आपल्या देशांबद्दल जर ज्ञान झाले तर आपोआप त्याबद्दल गर्व वाढतो.

बाहेरच्या अनेक देशातील मुस्लीमही सहजयोगात आलेत. मुसलमान लोकांची स्थिती फार चांगली नाही. ट्यूनिशिया इ. देशातील बरेच मुसलमान सहजयोगात उतरलेत. ते सर्व धर्मांना समान लेखतात. 'मुसलमान' या शब्दाचा खरा अर्थ 'जो ईश्वराला समर्पित' असा त्यांनी सांगितला म्हणून जे सहजयोगी तेच खरे मुसलमान असे समजू शकता. रशियात मी गेले तेथेही एकेक सहजयोगी मोठ्या गुणवत्तेचे, गहनतेत उतरलेले आहेत. त्या लोकांनाही स्वदेशाबद्दल अभिमान वाटतो. देशभक्ती जास्त वाटते. 'जो देशका नही वो परमात्मा नही।' 'लाओत्सेनेही 'ताओ'बद्दल लिहिलेले आहे. सर्व काही सहजयोगाबद्दल लिहिलेलं आहे. सहजयोग्याच्या स्वभावाबद्दल लिहिलेले आहे. चिनमध्येही लोकांना जास्त देशभक्ती आहे. अमेरिकेतील वस्तू बाजारात दिसणार नाही. मास्कोतही मुले झाडांची निगा राखताना दिसले. केवळ देशभक्तीतून चीन, जपान या देशाची प्रगती झालेली आहे. त्यांच्याकडून हे शिकण्यासारखे आहे.



तसे आपल्याकडे दिसत नाही. आपल्या परिसरात असणाऱ्या झाडांची किती जणांना माहिती असते. फुलांबद्दल किती जणांना माहित असते. यामधून अमेरिकेत आपण काय पाठवू शकतो, असा विचार हवा. आपल्याकडे उत्तम अत्तरे होतात. अगदी स्वस्त किंमतीत तेही शुद्ध पाण्यामध्ये बनविलेली. आपल्याकडील गुलाब, सोनचाफा, बकुळ, जाई-जुई, निशिगंध, मोगरा, इ. किती लोकांना माहिती आहे. महाराष्ट्रात त्यामानाने थोडी माहिती आहे. पण उत्तरेकडे तितकी नाही तसेच फळांबद्दलही असावी. महाराष्ट्रातील लोकांनीही गहनतेत उतरून कर्मकांड सोडून याची जाणीव वाढवावी.

# संक्रांती पूजा प्रतिष्ठान

प. पू. श्री माताजी निर्मलादेवींचे भाषण, पुणे १४ जानेवारी, २००१

## मराठीतील उपदेश

अधिक कर्मकांडात अडकलेले लोक सहजासहजी बदलत नाहीत, आम्हाला स्वभावात बदल घडवून आणला पाहिजे. उत्तर हिंदुस्थानात हे नाही. ते लोक गंगेत न्हातील परंतु त्यांच्यात परिवर्तन झाले आहे. खूप सुशिक्षित लोक सहजयोगात आलेले पाहून आश्चर्य वाटते.

येथे झालेल्या अनेक संतांनी आपले रक्त याठिकाणी ओतले, परंतु त्यांचा काहीही परिणाम झाला नाही. सर्व आयुष्य लोक कर्मकांडात घालवतात पण आता बदल घडलाच पाहिजे. तुम्ही जागृत व्हायलाच पाहिजे. पहाट उगवली तर झोपून राहण्यात काय अर्थ आहे?

महाराष्ट्राच्या बाबतीत फार दुःख वाटते. येथे इतक्या महान व्यक्तींनी कार्य केले पण लोकांना सहजयोग काही जमला नाही. आनंदाच्या गहनतेत आधी उतरायला पाहिजे आणि नंतर तो दुसऱ्यांनाही प्रदान करता आला पाहिजे.

मी महाराष्ट्राचीच आहे. येथे काही दुष्ट लोकांनी सर्व काही बरबाद केले आहे. पण तुम्हाला विशेष वरदान आहे, तुम्ही तरुण आहात आणि पुष्कळ काही करू शकता. महाराष्ट्रातील लोकांना सांगितले तर तप करतील, उपवास करतील, पति वा पत्नीचाही त्याग करतील, परंतु तपस्यापेक्षाही भक्ती अधिक श्रेष्ठ आहे. भक्ती ही आनंदस्वरूप आहे हे फार वेगळे आहे. जे भक्तीत लीन, रममाण होतात ते सहजयोगाला अगदी हृदयातून धरतात. सहजयोगाला कुठल्याही तपस्येची जरुरी नाही, काही सोडायचे नाही, जसे आहात तेथेच सर्व काही प्राप्त होते. परंतु दुसऱ्यांना दिले पाहिजे. मग आम जनतेला सहजयोग कशाला दिला गेला?

तपस्येतून काय मिळते, ते तुम्ही दुसऱ्याला देऊ शकत नाही. परंतु तुमच्या भक्तीतून सर्व काही देता येते. भक्तीसाठी काही द्यावे लागत नाही, जसे हे सोडा ते सोडा असले. काही नाही केवळ प्रतिज्ञा करा की माझे जीवन मी सहजयोगासाठी समर्पित करतो. काही सोडू नका. कसल्याच तपाची जरुरी नाही. तुमच्यातील भक्ती प्रसारीत झाली पाहिजे, ती लोकात प्रज्वलीत व्हायला हवी आणि पहा मग त्यातून काय आनंद मिळतो. आपल्यापुरताच सहजयोग सिमित ठेवला तर आनंद त्वरीत लुप्त होऊन जाईल. आनंद वाढविण्यासाठी तो दुसऱ्यात भरायला हवा, स्वतःपुरता सिमित ठेवू नका.

आपणा सर्वांकडून मला या सर्व अपेक्षा आहेत.

## इंग्रजी भाषणाचा अनुवाद

या दिवशी अनेक आशिर्वाद देवता तुम्हाला प्रदान करते. या दिवसापासून सूर्याचे दक्षिणेकडून उत्तरेकडे सरकणे चालू होते (उत्तरायण). सहजयोगात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तुमच्यातही बदल झाला पाहिजे. तुमच्यात परिवर्तन घडले पाहिजे. ती देवता प्रसन्न होण्यासाठी, तिचे प्रेम प्राप्त करण्यासाठी तुम्ही हे केले पाहिजे. **सहजयोगाचा प्रसार करा. मी जे उद्दिष्टांचे चित्र उभे केले आहे ते फार भव्य आहे. त्यासाठी हे महत्त्वाचे आहे आणि ते फलित करण्यासाठी तुम्ही खूप परिश्रम घेतले पाहिजे. हे जाणले पाहिजे की माझे चित्त कुठे भरकटतेय, काय करते, आपण काय करतो. श्री माताजींच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आम्ही काय करतो?** आम्ही असे किती आहोत ज्यांना सहजयोगाबद्दल ही जाणीव आहे.

हा अध्यात्माचा प्रकाश तुमच्यात दिसला पाहिजे. आम्ही केवळ आत्मा आहोत ही सतत जाणीव पाहिजे. दुसऱ्यांनाही तसे घडविले पाहिजे. हे केवळ एका व्यक्तीसाठी नाही. सहजयोग एका व्यक्तीपुरता मर्यादित असू शकत नाही. तो सर्व विश्वासाठी आहे.

जगात असे खूप सहजयोगी असतील जे सहजयोगाचा प्रसार करत नाही. ते आपल्या जीवनापुरतेच समाधान मानतात. त्यांना जे मिळाले त्यातच ते समाधान मानतात.

तुम्ही उघडपणे सहजयोगाविषयी बोलले पाहिजे. काही लोक फार बिचकतात. सहजयोग सांगण्याविषयी असे लोकही बरेच काही करू शकतील.

आपण शुद्ध, पवित्र व्हावे म्हणून लाखो लोक त्या गंगा नदीत येऊन स्नान करतात.

आपण काय प्राप्त केले याबद्दल किती लोकांना खात्री आहे, या बद्दल मला शंका आहे. पण ते जर जाणले तर प्रत्येकजण महान कार्य करू शकतो. त्यामुळे खूप समाधान मिळेल, ते ऋणमोचक आहे. तसा बरेच लोक आपला वेळ फुकट घालवतात. तुम्ही ते घडवून आणा. स्वतःचे आत्मपरीक्षण करा व मी सहजयोगांकरीता काय केले? असा प्रश्न विचारत जा. लोकांना हे पटविणे तसे अवघड आहे, त्यासाठी खूप परिश्रम घ्या.

**तुम्हाला सर्व विश्वात परिवर्तन घडवून आणायचे आहे याला महत्त्व द्या. ती वेळ आता आलेली आहे. नवीन क्लुप्त्या व कल्पनांना धरून कार्यासाठी सज्ज व्हा.**

# श्री चंद्रिका प्रसाद श्रीवास्तव साहेब यांचा संदेश

गणपती पुळे सेमिनार
दि. २९ डिसेंबर २०००



ही सर्व स्वर्गीय सभा आहे. ज्याचे अधिपत्य एका ईश्वरी व्यक्तीकडे आहे. येथे परमेश्वरी दूत एकमेकांशी विवाहबद्ध झाले आहेत. या सर्व नवदाम्पत्यांना त्यांचे वैवाहिक जीवन, सुखप्रद भरभराटीचे जावो अशा माझ्या सर्वांना शुभेच्छा. आमच्या लग्नाला जवळजवळ ५३ वर्षे झालीत, आपणही असेच दीर्घकाळ सुखाने एकमेकांशी नांदावे. तसेच तुमची मुले, नातवंड पणतू सर्वामध्ये असेच विवाह येथे तुमच्यासारखे माताजीसमोर झालेत, तसे व्हावेत. अशी माझी इच्छा आहे. त्या अमर आहेत. माझ्या प्रिय सहजयोगिनों नवे वर्ष तुम्हाला समाधानकारक ठरो' अशी शुभेच्छा मी तुम्हाला देत आहे. त्याहीपुढे मला असे सांगायचे की या २१ मार्च २००१ ला श्री माताजी ७८ वर्षाच्या होतील आणि नंतर पुढे २ वर्षांनी ८० वय पूर्ण होईल. त्यावर्षी जगात ८० दशलक्ष सहजयोगी असतील असा निश्चय' तुम्ही आज केला पाहिजे व तयार झाले पाहिजे. ज्यांनी हा भव्य समारोह यशस्वी व्हावा म्हणून जे नियोजनबद्ध प्रयत्न केले त्यांना आमचे मनःपूर्वक धन्यवाद. विशेषतः श्री नलगीरकर व योगी महाजन यांना एकत्र आणणाऱ्याचे विशेष आभार. या कार्यास पडद्यामागे राहून कार्य करणाऱ्याचे त्यातल्या त्यात सतत मंचाचे संचलन करणारे श्री. अरुण गोयल व या कार्यात अखंड परिश्रम करणारे श्री मगदुम यांचे विशेष आभार. त्यानंतर श्री निकू माहित नाही हे सर्व कसे जेवणाचे सांभाळतात त्यांचेही विशेष आभार. नंतर आम्हाला स्वर्गीय संगीताचा आनंद देणारे सर्व कलाकार, हैद्राबाद, दिल्लीहून आलेले कवाली गायक नागपूरचे संगीत कलाकार व इतर या सर्वांचे संगीताचा आनंद देणाऱ्याचे मनःपूर्वक आभार. शेवटी क्षणभर या माझ्या पत्नीनाही मी आभारी आहे. या समारंभाचे यजमानपद दिल्याबद्दल मला या ठिकाणी दिलेल्या आमंत्रणाबद्दल पुनश्च धन्यवाद.

# गणपतीपुळे २००० सेमिनार वृत्तांत

संक्षिप्त



सर्व जगातील सहजयोगी ज्याची आतुरतेने वाट पहात असतात अशा भव्य सामुहिकतेचा आनंद देणारा गणपतीपुळे येथील सहजयोग्यांचा आंतरराष्ट्रीय मेळावा दि. २३ डिसेंबर ते २९ डिसेंबर २००० पार पडला. सहस्त्रकातील हा शेवटचा सेमिनार मोठ्या उत्साहात शिस्तीने चैतन्याच्या एका नव्या उमेदीत पार पडला. या सेमिनारात सहजयोग्यांचे आगमन होण्यास सुरुवात झाली. सेमिनारच्या कार्यक्रमाचा आरंभ २३ तारखेला सायंकाळी मोठ्या उत्साहात झाला. त्यानंतरच्या रोजच्या कार्यक्रमात सकाळी मुख्य शामियानामध्ये सामूहिक ध्यानाचा कार्यक्रम होत आला. ध्यानाचा कार्यक्रम चर्चासत्रे व संगीताचे कार्यक्रमाचे सर्व सूत्रसंचालनाचे काम श्री अरुण गोयल यांच्यावर सोपविण्यात आले व ते त्यांनी आपल्या कुशलतेने समर्थपणे व्यवस्थित हाताळले. सकाळच्या ध्यानानंतर रोज साधारण साडेदहा अकरा वाजता सकाळच्या चर्चासत्राला आरंभ होई. यामध्ये युवाशक्तीच्या कार्याची रुपरेषा व त्याबद्दलचे सर्व मार्गदर्शन श्री गौतम यांच्या अधिपत्याखाली झाले. तसेच सकाळच्या चर्चासत्रात सेमिनारबाबतच्या सूचना सहजयोग्यांना प्रोटोकोलबाबत मार्गदर्शन, सहजयोग प्रसाराबाबत मार्गदर्शन भेटींचे वाटप सर्व केंद्रप्रमुखांची सभा इ. कार्यक्रम घेण्यात आले. याचा नवीन आलेल्या सहजयोग्यांना निश्चितच मोठा फायदा झाला.

संध्यकाळच्या सत्रात दरवर्षीप्रमाणे संगीताचे गायन, वाद्यसंगीत नृत्य भजने आदि कार्यक्रम सादर करण्यात आले. नेहमीप्रमाणे संगीत सरीताने सादर केलेली भजने व गाणी रंगतदार व सुरेलपणाने सादर करण्यात आली. त्यातल्यात्यात नागपूरच्या श्री प्रकाश खापर्डे यांनी अतिशय खड्याआवाजात दमदारपणे गायलेल्या दरबारी रागाने श्रोत्यांवर विशेष छाप पडली. श्री अनिल छाया, श्याम जैन अरुण शिवळीकरांचे सतार वादन, गुरुजी धाकडे यांचे व्हायलिनवादन व या सर्वांना समर्थपणे संदेशने तबल्यावर केलेली सुरेख साथ यामुळे सर्व कार्यक्रम बहारदार झाला. इतर कलाकारात मुंबईचा बालगायिका शिला तांबे, डॉ. राजेश दीपक वर्मा, श्री सुब्रण्यम या सहजयोग्यांनी नेहमीच्या उत्साहाने आपले कार्यक्रम सादर केले. तसेच पुणे युवाशक्ती मुंबई कलेक्टिव्हीटी पंजाब युवाशक्ती हरिद्वार आंध्र येथील युवा कलाकार नोईडा ग्रुप धर्मशालातील व जेजुरी शाळेच्या विद्यार्थी कलाकारांनी सादर केलेली भजने, लोकनृत्ये इ. कार्यक्रमाच विशेष उल्लेख करणे



गणपतीपुळे सेमिनार मधील सहजयोग्यांसाठी मोफत वैद्यकीय सुविधांचा स्टॉल




हळद लावण्याची मजा घेत होते. हळदीचा कार्यक्रम मोठ्या जल्लोषात पार पडला.

दुपारी मुख्य सभा मंडपात विवाह सोहळ्यासाठी तयारी सुरू झाली. लग्न विधीसाठी ६२ होमकुंड सजवलेले दोन आंतरपाट, वधूवरांसाठी पुष्पहार, माळा, इत्यादी सामुग्री सप्तपदी, कन्यादान अक्षता वाटप याची उत्तम रितीने तयारी करण्यात आली. सायं. ६वा, सर्व वर मंडळी उत्तम वेष, मंडोळ्या परिधान करून समुद्रकिनाऱ्यावरील एका मंडपात सज्ज झाली. तेथे श्री माताजींच्या आगमनानंतर श्री माताजींचे पूजन व आशिर्वाद घेऊन वाजतगाजत सजवलेल्या वाहनातून मुख्य शामियानाकडे निघाले. मिरवणूक येईपर्यंत मुख्य सभा मंडपात श्री माताजींनी नटून आलेल्या नववधूकडून गौरीपूजन करून घेतले व आशिर्वाद दिले. श्री माताजींना वधूवरना केलेल्या उपदेशाची व जबाबदारी इ. विषयीचे भाषण अंकात इतरत्र दिले आहे. त्यानंतर मंगलाष्टके होमहवन, कन्यादान सप्तपदी नंतर शेवटी भोजन सहजविधीनुसार हा विवाहसोहळा आदिशक्तीच्या कृपेत मोठ्या आनंदात पार पडला. लग्नतयारीसाठी लागणारे नियोजन श्री नलगीरकर, श्री. शुक्ला, श्री. अशोक चव्हाण व निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थितपणे झाले.


गणपतीपुळे सेमिनार पूर्वतयारी व त्याचे नियोजन सेमिनारसाठी होणाऱ्या सहजयोग्यासाठी राहण्याची, सजावट बसण्याची व्यवस्था व त्याच्या मंचासह लागणारी सुखसोयी यासाठी ऑक्टोबरपासून येथे येऊन मुंबई व इतर काही केंद्रातील सहजयोग्यांनी जे अविरत परिश्रम घेतले त्यांची

उचितच आहे. इ. प्रख्यात कलाकारांत मीना फातरफेकर, अजित कडकडे यांचे गायन ओडिसी कलाकार श्रीमती श्रीना सत्यनाथन यांचे नृत्य श्री प्रसन्ना यांचे बासरी व शहनाई वादनाने कार्यक्रमांना विशेष रंगत आली. तसेच हैद्राबाद व निझामुद्दीनचे सहजयोग्यांना परिचित असलेल्या कवाली गायकांनी गायलेल्या या कव्वालींनी अगदी धम्माल उडविली. अशा रितीने भरगच्च संगीताच्या कार्यक्रमात सहजयोग्यांनी भरपूर आनंद लुटला. हा आनंद द्विगुणीत होण्यासाठी प. पू. श्री माताजी व त्यांचे यजमान आदरणीय श्री श्रीवास्तवसाहेब दि. २४ ते २९ दोघेही सायंकाळच्या कार्यक्रमास उपस्थित होते.

**विवाहसोहळा :**

गणपतीपुळे येथील सेमिनारमधील एक महत्वाचा समजला जाणारा विवाहसोहळा व प. पू. श्री. माताजींच्या आशिवार्दात दि २९ रोजी संपन्न झाला दि. २६ च्या सायंकाळी कार्यक्रमाच्या शेवटी अपेक्षित वधूवरांच्या युगलांची विवाहासाठी नावाची यादी श्री योगी महाजन व श्री राजेंद्र पुंगालिया यांनी जाहीर केली. तेव्हापासून उपवर वधू मोठ्या जिज्ञासेने एकमेकांना भेटून आपला परिचय देत विवाहाचा निश्चय करण्यात गुंतलेले दिसत होते. एकूण यावर्षी ६२ विवाह संपन्न झाले.

दि. २९ डिसेंबर सकाळी १० वाजल्यापासून हळदीच्या कार्यक्रमासाठी सहजयोगी समुद्रकाठी जमू लागले. सर्व जमलेल्या निरनिराळ्या देशातील वर वधू यांचे आगमन झाले. बेंजोपार्टीच्या निनादात सहजयोगी व सहजयोगी आप्तेष्ट वरवधूंना व एकमेकांना



**गणपतीपुळे सेमिनार मधील मुख्य पेंडॉल मध्ये प्रथमच दोन सोळा एम एम. चे स्क्रीन लावण्यात आले.**




लोकांचे लक्ष वेधीत होते. लग्नाचे दिवशी मागील पडद्यावर विद्युत रोषणाईचे होमकुंड व फिरत्या सप्तपदीचा देखावा उभा केला होता. संपूर्ण सेमिनारकरिता केलेली सजावट अतिशय भव्य व सुबक होती. सजावटीचा भार मुंबईचे श्री कुबल व इतर सहकारी यांनी उचलला होता.

यावर्षी प्रथमच सहजयोग्यांना पिण्याची स्वच्छ पाणी मिळावे म्हणून कोल्हापूरच्या बालाजी मिनरल वॉटर या कंपनीकडे व्यवस्था होती. रोज ४०० ते ५०० कॅन (प्रत्येकी २० लि.) पाणी ट्रकमधून येत असे. त्यांचे कर्मचारी सर्वांना रोज पाण्याचे (बिसलेरी) मोफत वाटप करीत होते. सर्व सहजयोग्यांना शुद्ध पाणी मोफत मिळावे याचे श्रेय चेन्नई येथील सहजयोगींच्या सामूहिकतेला जाते.

समारोपाच्या समारंभात या सेमिनारच्या उत्कृष्ट आयोजनासाठी श्री माताजींच्या हस्ते श्री आर. डी. मगदूम यांचा सत्कार करण्यात आला तसेच जेवणाची इ. चोख व्यवस्था करणारे श्री. निकू यांचाही सत्कार करून त्यांचे आभार मानण्यात आले. नंतर श्री योगीजींनी श्री माताजी सेमिनारमधील सहभाग व मार्गदर्शनाबद्दल तसेच आदरणीय श्री वास्तवसाहेब यांच्या उपस्थितीबद्दलही सर्वजन अत्यंत आभारी ऋणी असल्याचे सांगितले सर्वात शेवटी मा. श्री. श्रीवास्तवसाहेबांचा प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात संयोजकांचे, श्री. अरुण गोयल, श्री. नलगिरकर योगी महाराज श्री निकू व मगदूम यांचे मनापासून कौतुक केले व आभार मानले. सर्वांना येणाऱ्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या व या कार्यक्रमाची सांगता झाली.

✿ ✿ ✿

वाहवा करणे, त्यांचे आभार मानणे हे रास्तच आहे. त्यासाठी ॲडव्हायजरी, ॲडमिनिस्ट्रेशन अकॉमडेशन अकाऊन्टस्, डेकोरेशन ट्रान्स्पोर्ट रजिस्ट्रेशन पर्चेस इत्यादीसाठीच्या कमिट्या कार्यरत होत्या. निर्मलनगरीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ जवळजवळ ६० फूट उंचीची आकर्षक रंगाची भव्य कमान उभारण्यात आली होती. मुख्य कमानीचा दर्शनी भाग कायम स्वरुपाच्या बांधकामात केला होता. पुढील बाजूस अर्ध गोलाकार खांब व मागील नक्षीकाम असलेले खांब लोकांचे लक्ष वेधून घेत होते. पुढे गेल्यावर मधल्या रस्त्यावर आणखी एक रंगीत कापडी कमान लावण्यात आली होती व पुढे उजव्या हाताला आकर्षक कारंजे उभे केले होते. मुख्य शामियानाचे प्रवेशद्वार साधारण १५ फूटी डेरेदार खांब नक्षीकामासह कमातीला सुशोभित करत होते. मधोमध लाल रंगात श्री गणेश साकारले होते. श्री माताजींची गाडी मुख्य मंचापर्यंत जाण्यासाठी मार्ग केला होता. स्टेजच्या समोरच्या बाजूला कठड्याला व गाडीच्या मार्गावर प्लॅस्टीकच्या पाईपला संलग्न असलेले नवीन प्रकाशाचे विद्युत दिवे अधिकच शोभिवंत वाटत होते. स्टेजच्या मागील भागावर आकर्षक रंगाच्या चमकीचा वापर करून दोन मोर विरुद्ध दिशेला तोंड करून पिसारा उभारून उभे ठाकले होते. त्यांच्यामधोमध थोडेसे वर एक गुलाबी रंगाचे फिरते कमळ दिसत होते. पहिले दोन दिवस मोरांच्या दोन्ही पिसाऱ्यांच्या मधील जागेत उभ्या गणेशाचे चित्र फारच मनोवेधक होते. त्यानंतर त्याच जागी पूजेच्या दिवशी बाळाला घेतलेल्या मेरी मातेचे चित्र लावण्यात आले या दोन्ही चित्रातील जिवंतपणा


गणपतीपुळे सेमिनार मधील रोजचे स्टेज वरील फुलांच्या सजावटीचे काम करताना

# श्री गणेश पूजा

## प. पू. श्री माताजी निर्मलादेवींचे भाषण

कबेला : १६ सप्टेंबर २०००

आज आपण श्री गणेशांची पूजा करणार आहोत. श्री गणेश हे शुद्धतेचे व पावित्र्याचे प्रतीक आहेत. आणखी एक गोष्ट श्री गणेशांची पूजा करताना लक्षात घेतली पाहिजे की ते अबोधिततेचे मूर्तिमंत स्वरूप आहेत. अबोधितता तुम्ही नीट समजून घ्यायला हवी. अबोधितता हा माणसातील जन्मतः मिळालेला गुण आहे; अबोधितता बाहेरून मिळवता येत नाही. कारण तो अंगभूतच असलेला गुण आहे. श्री गणेश भक्तांमधे अबोधितता असलीच पाहिजे; अशा माणसाला लुच्चे लोक फसवतील किंवा आक्रमक लोक त्याला काबूत घेण्याचा प्रयत्न करतील पण हा अंगभूत असलेला गुण कुणी हिराऊन घेऊ शकणार नाही. अबोधितता हा आत्म्याचा गुण असल्यामुळे आत्म्याचा प्रकाश मिळाल्यावर तुम्हाला सर्व विरोधी व घातक प्रसंगांतून पार पडण्याची शक्ति मिळते; तसेच चुकीच्या व तुमच्या उन्नतीच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टींवर तुम्ही मात करू शकता. ही आत्म्याची शक्ति असल्यामुळे अध्यात्मिक जाणीव प्रगल्भ होण्यासाठी तुम्हाला ती मदत करते. म्हणून ही अबोधितता बाहेरून मिळवता येत नाही तर तुम्ही आतमधे ती बाणवली पाहिजे. हे सहजयोगामधून आत्मसाक्षात्कार मिळवल्यावरच घटित होऊ शकते. मग जीवनातील सर्व प्रकारच्या विरोधी व निगेटिव्ह गोष्टींपासून श्री गणेशांची माता तुम्हाला संरक्षण व आधार देते आणि तुमचा सांभाळ करते.

आजकालच्या परिस्थितीमधे अबोधिततेबद्दल बोलणेही अवघड झाले आहे. ख्रिस्तांचे जीवन तुम्हाला माहीत आहेच. ते इतके निरागस होते की, भोवतालच्या लोकांनाही ते निष्पाप समजत होते. म्हूणन ढोंगी माणसांना त्यांच्यासारखे बोलणे जमत नाही. कारण ढोंग लोकांना ढोंगी करणाऱ्या त्यांच्यासारख्या लोकांचीच भाषा समजू शकते. पण ख्रिस्त जे काही बोलत असत त्या शब्दांना व्हायब्रेशन्स होती; त्यांच्या बोलण्यात अबोधितता होती. म्हणून त्यांचे बोलणे ऐकणाऱ्या लोकांचे त्यांच्याबरोबर चांगले संबंध जुळून यायला हवे होते. पण कदाचित तो काळच त्यासाठी अनुकूल नसावा, त्यावेळच्या लोकांची स्थिति आत्मसाक्षात्कार मिळण्यासारखी नव्हती. पण श्रीगणेशांची ही अबोधितता तुम्हाला कधीच अपयश मिळू देणार नाही; उलट त्यामुळे ख्रिस्तांसारख्या जीवनाला एक प्रकारच्या सौंदर्याने व पावित्र्यामुळे उजळून टाकणारी आहे.

तुमच्यापैकी ज्यांनी आज वैवाहिक जीवनात पदार्पण करण्याची शपथ घेतली आहे व हे विवाह होत आहेत याचा मला आनंद होत आहे. विवाह कशासाठी करायचा, त्या पवित्र संस्कारामधील भूमिका व तत्त्व काय आहे, हे तुम्ही नीट समजून घ्यायला हवे. लग्नबंधनाशिवाय एकत्र राहणारे स्त्री-पुरुष असतात. पण विवाहामुळे जीवनाला एक अर्थ, पावित्र्य व मान्यता येते; त्यामधे तुमच्या शारीरिक, भावनिक व मानसिक जीवनामधे समग्रता येते. विवाहबंधनाशिवाय नुसत्या सहजीवनाला परिपूर्णता येत नाही; त्यामधून जन्माला येणारी संतति चांगली होणार नाही; म्हणूनच विवाह-विधीची जरुर असते. ख्रिस्तही त्यासाठी लग्न-समारंभाला जात होते; कारण बाकी इतर संबंधापेक्षा पती-पत्नीचे नाते विधिपूर्वक मान्य झाले पाहिजे. नाही तर मुलांवर कसेही संस्कार नसल्यामुळे ती चोर, डाकू, खुनी अशी भरकटलेली होतील. म्हणून विवाह-विधीला पावित्र्य देण्यासाठी ख्रिस्त विवाहप्रसंगी हजर होते. पण ते लक्षात न घेता त्यांनी पाण्यापासून दारु बनवण्याचा चमत्कार केला. अशी चुकीची कहाणी पसरवण्यात आली. खरे तर त्यांनी पाण्याचा द्राक्षासव बनवला. दारु बनवणे फार जिकीरीचे काम आहे. पण त्या लोकांना ख्रिस्तांनीही दारु पिण्यास मान्यता दिली आहे असा भ्रम लोकांसमोर निर्माण करायचा होता व या स्वार्थापोटी अशी चुकीची समजूत पसरवण्यात आली. एकदा एक ख्रिश्चन माणूस माझ्याकडे येऊन जागृति मागू लागला; मी त्याला फक्त व्हायब्रेट करून पाणी प्यायला दिले तर त्याची चव वाईन (Wine) सारखी असल्याचे त्याने सांगितले. तेच ख्रिस्तांनीही केले होते. ख्रिस्त दारु प्या असे म्हणणेच शक्य नाही. दारुमुळे माणसाची जाणीवच मृतवत होते. अशा चुकीच्या कहाण्या पसरवणारे लोक विकृत बुद्धीचे असतात; त्यांचे विचार, बोलणे-चालणे-वागणे फार आक्रमक तरी असेल नाही तर माणूस म्हणता येणार नाही इतके विचित्र असेल. जिथे-जिथे दारु पिणे हा शिष्टसंमत

शिष्टाचार मानला जातो ते लोक रसातळाला जाणार आहेत; अशा लोकांमुळे फसवेगिरी, लुच्चेपण, नुकसानकारक प्रवृत्ति सगळीकडे पसरतात; असे लोक कसलेही अनीतिशून्य कृत्य करायला कचरत नाहीत.

अबोधितता तुमच्यामधे प्रस्थापित झाली की तुम्ही कुठल्याही चुकीच्या मार्गाकडे वळणार नाही अशी प्रखर जाणीव तुम्हाला येते. माणसामधील शुद्ध व सावध जाणीवेला फार महत्त्व आहे. म्हणून तुमच्या चेतनेची शुद्धता तुम्ही जपली पाहिजे. सहजयोग्यांनी या बाबतीत फार काळजी घेतली पाहिजे. तुमचे आरोग्य ठीक राखण्यासाठी याची फार मदत होत असते, कारण चेतना जागृत राहिली म्हणजे तुम्ही चुकीच्या गोष्टी करत नाही. सहजयोगामधील विवाहाला माझे आशीर्वाद मिळतात ही तुमच्यासाठी फार मोलाची गोष्ट आहे. सहजयोगाच्या विधीनुसार केलेले विवाह यशस्वी झालेच पाहिजेत; तसे झाले नाही तर ती तुमची चूक आहे; तुमच्या डोक्यात लग्नाबद्दल व वैवाहिक जीवनाबद्दल काही भ्रामक कल्पना असतील तर प्रथम त्यात सुधारणा करा, सहजयोगामधील विवाह-बंधनाच्या पावित्र्याचा आदर राखा. मग जोडीदार कसाही असला तरी त्याला त्याच्या चुकांसकट स्वीकारल.

खिस्त आणि श्री गणेश यांचा जन्म सामान्य माणसासारखा नसून ते आयोजित होते हे तुम्हाला माहीत आहेच. कारण ते अबोधिततेचे मूर्तिमंत स्वरूप होते व त्यांना जन्माला येण्यासाठी विवाह-संस्थेच्या रुढीची जरुर नव्हती. ते जन्मतःच पूर्णपणे अबोधिततेचे साकार रुप होते. ते परमेश्वरी शक्तीस्वरूप होते. पण सामान्य माणसाला जन्म देण्यासाठी विवाहपूर्ण विधिबंधनांची जरूरी आहे. अवतार व मानव यातील हा फरक आहे. अवतरण रुप खऱ्या अर्थाने समजणे मानवाला अवघड होते; त्यासाठी पूर्ण शुद्धता व अबोधितता असायला हवी. अबोधितता वृद्धिंगत होण्यासाठी सहजयोग खूप मदत करतो. निर्विचारावस्था परिपक्व झाल्यावर अबोधितता प्रगट होते. उदा.- रस्त्यावरून चालताना तुम्ही निर्विचार राहिलात तर मनात प्रतिक्रिया उमटण्याची क्रिया थांबते. तुम्ही वाद-विवादात अडकत नाही. फक्त साक्षी बननू असता व त्यावेळी ही अबोधितता उमलू लागते. म्हणून कसलाही प्रसंग वा परिस्थिति असली तरी प्रतिक्रिया होऊ न देण्याची (no reaction) सवय लावून घ्या. प्रतिक्रिया करतो त्यावेळी आपण त्या व्यक्तिमधे वा परिस्थितीमधे गुंततो, involve होतो. अबोधितता जसजशी बळावते तसतसे तुमची क्षमता वाढते. तसे झाल्यावर तुम्हाला त्रास देणारी वा भांडण व वादविवाद करणारी व्यक्ति तुमच्यापुढे दुर्बल बनते. मला कुणी काही भेट वस्तू देतात तेव्हा मला खूप आनंद होतो, तेव्हा माझ्या मनात भेट दिलेल्या वस्तूचे फक्त कौतुक असते. त्याचा रंग, आकार इ. बद्दल माझ्या मनात काही प्रतिक्रिया उमटत नाहीत. हा लहान मुलासारखा आनंद असतो, त्याच्या हातात काहीही दिले तरी त्याचा चेहरा फुलतो. त्यांच्या दृष्टीने जीवन म्हणजे फक्त आनंद असतो. खेळणे-बागडणे असते. म्हणून मुलांच्या संगतीत मोठ्यांनाही आनंद मिळतो. हे एक प्रकारचे निर्विचार स्थितीमधून मिळणारे समाधान असते. बऱ्याच जणांना वाटते की निर्विचार होणे अशक्य आहे, पण ही प्रतिक्रिया न करण्याची सवय जागरुकतेने लावून घेतली तर निर्विचारावस्था हळूहळू वाढते. आणि हे तुमचे तुम्हालाच जाणवते. मग तुमच्यातील वेगळेपणा इतरांच्याही लक्षात येतो. समजा, रस्त्यांत दोघांचे भांडण चालले असेल तर सामान्यतः प्रत्येक जण त्यात भाग घेण्याचा प्रयत्न करताना दिसतो; पण तुम्ही शांतपणे नुसते बघत राहिलात तर तुमच्यामधील अबोधिततेचा प्रभाव पडू शकतो. अबोधितता हा आत्म्याचा गुण असतो व तो कशामुळेही नष्ट करता येत नाही. आधी तुम्ही असंतुष्ट, आक्रमक, त्रासदायक स्वभावाचे असलात तरी सहजयोगात आल्यावर तुमचे व्यक्तिमत्त्व साफ बदलते व तुम्ही एक सुंदर, प्रसन्न वृत्तीची व्यक्ति बनता. त्याचा तुम्हाला आनंद मिळतोच पण इतर लोकांनाही तुमच्या सहवासाचा आनंद मिळतो.

अबोधितता परम सत्य (absolute) आहे. तसेच ज्ञानमय असते. तिच्या कार्यामधे कुठलाही हेतू नसतो. तिचे कार्य पूर्णपणे हेतूशून्य असते; त्यामुळेच तिचे कार्य आनंददायक असते. आपल्या आजूबाजूला चाललेल्या सर्व धडपडीचा फोलपणा ती तुम्हाला पटवून देते आणि मग तुम्ही सर्व परिस्थितकडे साक्षीभावाने पाहू शकता. अबोधिततेचा हा गुण Linnate आहे. म्हणून स्वतःच स्वतःला अबोधित समजण्याची चूक तुम्ही करू नये. उलट तुम्ही सतत आत्मपरीक्षण करत राहून स्वतः आपण काय करतो, दुसऱ्या लोकांसाठी काय व किती करतो हे तपासत रहा.

मी emotional intelligence बद्दल तुम्हाला सांगितले आहेच; त्याचा आविष्कार अबोधितताच दर्शवते. अर्थात तो श्री गणेशांचा आविष्कार आहे. ज्या मुलांना हा आशीर्वाद असतो ती तुम्हाला जे आवडते ते करतात, तुम्हाला काय हवे आहे हे जाणतात, तुम्हाला आनंद कशामुळे देता येईल हे बघतात; त्यांना स्वतःच्या मागण्या

नसतात तर तुम्हाला आनंद देणे हीच त्यांची भावना असते. आणि त्याच भावनेतून त्यांचे काम चालते. जणू मोठी माणसे असल्यासारखे ती वागतात. अबोधितता तुम्हाला प्रगल्भता देते. लहान मुलांकडून आपल्याला शिकण्यासारखे खूप काही असते; त्यांना काही लपवून ठेवण्याची भावना वा वृत्ति नसते. कधी कधी त्यांच्या भाबडेपणामुळे आपणच अडचणीत येतो. हा तुम्हालाही अनुभव आला असेल. त्यांना खोटे बोलताच येत नाही; हा मोठ्या माणसांचा गुण आहे. लहान मुलांना मोठे लोकच बहुधा 'माझे'पणाची सवय लावतात; 'तुझा चेंडू दुसऱ्याला द्यायचा नाही' असे शिकवतात. त्यांच्यावरच सोपवले तर स्वतःची कोणतीही वस्तु दुसऱ्याला द्यायला ती तयार असतात. मुलांचे असे वागणे आल्हाददायक असते. मुलांना हे कसे जमते याचेच आश्चर्य वाटते. खरे तर हे श्री गणेशांचे त्यांना मिळालेले आशीर्वाद आहेत. तुम्हीसुद्धा मुलांसारखे बनायचा प्रयत्न करा. तुम्ही श्रीमंत असा, विद्वान असा किंवा आणखी कोणी विशेष असा पण तुम्ही मुलांसारखे असले पाहिजे. नाही तर कुणालाही तुमची संगत आवडणार नाही; तुम्ही बोअर करणारे असे सर्व म्हणतील. 'अमुक केले पाहिजे', 'तमुक करू नका' यासारख्या लेक्चरबाजीमुळे काही साध्य होणार नाही. त्याचप्रमाणे तुमच्यामधील अबोधितता परिपक्व झाली पाहिजे. मग तुम्हाला कुणी काही बोलले, तुम्हाला विरोध केला तरी त्याचा तुमच्यावर परिणाम होणार नाही. म्हणून आत्मपरीक्षण करून आपण अबोधित आहो का हे तपासून बघा. कधी कधी तुम्हाला वाटत असते की कुणीतरी आपल्यावर वरचढपणा दाखवतो, आपल्याला खाली खेचण्या प्रयत्न करतो किंवा त्रास होईल असे वागतो, पण तुमची अबोधितता या सर्व प्रसंगातून तुम्हाला तारेल; एवढेच नव्हे तर तुमची प्रकृति, तुमचे मन, तुमचे विचार व भावना या सर्वांमधे तिचाच आविष्कार होत राहील व तुम्ही आतमधून आनंदी बनाल.

आजकाल समाजामधे कुणाला कशाची लाज वाटेनाशी झाली आहे. पुरुष व स्त्रिया एकमेकांना आकृष्ट करण्याच्या मागे लागले आहेत. याला कारण म्हणजे ते आत्मसन्मान विसरले आहेत. अबोधिततेमुळे तुम्ही आत्मसन्मान राखता, कुणाच्या पायावर डोके ठेवणे नाही; किंवा दुसऱ्याला तुमच्या पायाशी येऊ देणार नाही. म्हणून मी श्री गणेशांची पूजा करायला सांगत असते. त्याने तुमचे मूलाधार चक्र सुधारते, स्वतःबद्दलचा आत्मसन्मान करायला शिकता, तुमची मानसिक धारणा सुदृढ होते, वाईट भाषा तोंडातून निघत नाही. अबोधितता प्रस्थापित झाल्यावर तुम्ही सत्याबरोबर राहता व तुमच्या बोलण्यात सत्यच येते. म्हणून तुम्ही स्वतःची अबोधितता जपा व इतरांच्या अबोधिततेचा आदर राखा. चुकीचे नजरेस आले तरी रागीट बोलून राग प्रकट करू नका. तसेच आपल्या दृष्टीचा आदर राखा. भिरभिरणारी नजर हानिकारक असते, आत्मसन्मान राखल्यावर पक्षी, फुले, झाडे यातील खरे सौंदर्य तुम्हाला समजेल. मग तुमचे व्यक्तिमत्त्व, सर्व हीन प्रवृत्ती नष्ट होऊन एका उच्च स्तरावर येते. हीच अबोधिततेची शक्ति आहे. अबोधिततेमधून आनंदाचा अनुभव मग तुम्हाला प्राप्त होईल.

सर्वप्रथम श्री गणेशांना आदिशक्तीने निर्माण केले ते अबोधिततेची शक्ति प्रस्थापित करण्यासाठीच. माणसाला कळो व ना कळो, आतून मार्गदर्शन करणारी शक्तीही हीच. त्यातूनच माणूस उच्च व महान स्थितीला येऊ शकतो. तेच तुम्हाला मिळवायचे आहे. मग समाजामधे कुठेही गेलात तरी तुमचा प्रभाव पडेल. अबोधितता बाणली की तुम्हाला आनंद समजतो व त्यासाठीच श्री गणेशांची निर्मिती झाली. ही अबोधितताच तुमचे सर्व प्रश्न दूर करणार आहे. जगाचे प्रश्न दूर करणार आहे, श्री गणेश जर तुम्हाला नीट समजले नाहीत व तुमच्यामधील श्री गणेशांचा आदर राखला नाही तर तुमचे काय होईल मला सांगता येणार नाही. माणसा-माणसांमधील संबंधांचे पावित्र्य न राहिल्यामुळेच आजकाल भयानक रोग पसरले आहेत. अबोधिततेमुळेच भाऊ-बहीण, माता-पिता, पती-पत्नी इत्यादी सर्व संबंध सुंदर व पवित्र होतात. त्यामुळेच सर्व संबंधामधे प्रेम बळकट होते.

नवीन विवाह करणाऱ्यांनी हे सर्व नीट समजून विवाह-बंधनाची जरूरी व पावित्र्य समजून घेतले पाहिजे. माझ्या समक्ष हे विवाह होत आहेत याचे महत्त्वही लक्षात घ्या. सध्याच्या युगात प्रत्येकाने अबोधिततेला जपणे फार महत्त्वाचे आहे. तुमच्यामधील श्री गणेश जागृत व प्रसन्न राहिले की तुमच्यामधूनच इतर मानव जातीचा उद्धार होणार आहे. म्हणून सर्वप्रथम तुमची अबोधितता महत्त्वाची आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला हे तुमचे भाग्य आहेच; आता श्री गणेशांना प्रसन्न ठेवणे हेच तुमचे प्राथमिक कार्य आहे, म्हणजे त्यांच्या अबोधिततेची कृपा तुम्हाला मिळेल.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

# सहज-समाचार

## गणपतीपुळे सेमिनार सेंटर
## लिडर मिटींग वृत्तांत

दि. २७-१२-२००० रोजी श्री. अरूण गोयल यांनी सेंटर लिडरांची मिटींग आयोजित केली होती. त्यामध्ये खालीलप्रमाणे चर्चा झाली –

सर्व सहजयोग्यांनी संपूर्ण भारतभर सहजयोग प्रसार करणे व वेळोवेळी घेतलेल्या प्रोग्रामचा रिपोर्ट लिडरने गोयकांकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यावरून भारतात किती राज्यात सहजयोग प्रसार व प्रचार करणे आवश्यक आहे ते ठरविणे शक्य होईल.

प्रत्येक सहजयोग्याने वर्षाला कमीत कमी १००० लोकांना सहजयोग सांगणे आवश्यक आहे. तसे प्रत्येकाने ठरवावे.

एकाच शहरात अनेक सेंटर असतात. त्यावेळी एखाद्या ठराविक सेंटरला खूप चांगली व्हायब्रेशन आहेत. दुसऱ्या सेंटरला कमी व्हायब्रेशन आहेत अशी चर्चा करू नये.

सेंटरचा वर्षाला आपण ठरविलेल्या फक्त ११ पूजा करणे आवश्यक आहे. त्याव्यतिरिक्त विशेष जाहीर झालेली पूजा करावी. तसेच शहरातल्या मुख्य सेंटरमध्येच पूजा होणे आवश्यक आहे. तसेच पूजेला सर्व ट्रिटमेंट करून जाणे आवश्यक आहे.

सेंटर लिडरचे वागणे सर्व सहजयोग्याबरोबर नम्र व निःपक्ष असावे.

प्रत्येक मुख्य सेंटरमध्ये लायब्ररी असणे आवश्यक असून त्यामध्ये सर्व सहजयोगाची पुस्तके, व्ही. डी. ओ. टेप्स, ऑडिओ टेप्स ठेवणे आवश्यक आहे.

नवीन लोकांना ध्यानाचा फोटो व परिचयपत्रके मोफत देणे आवश्यक आहे.

प्रत्येक सेंटरने स्वतःचा म्युझिक ग्रुप तयार करणे तसेच स्वतःचे म्युझिक साहित्य, ध्वनीक्षेपक ठेवणे आवश्यक आहे.

प्रत्येक सेंटरमध्ये श्रीमाताजींची व्हायब्रेटेड पाणी, कुंकु/मीठ, साखर उपलब्ध असावे, नसल्यास दुसऱ्या सेंटरकडून घेणे.

सेंटरची वेळ १ तासापेक्षा जास्त ठेवू नये. तसेच सुरूवातीला १५ मिनिटापेक्षा जास्त भजने म्हणू नये.

प्रत्येक महिन्याला सेंटरचे हिशोब सादर करणे अत्यंत आवश्यक आहे.

गणपतीपुळे प्रोग्रामला येताना सेंटर मार्फत लिडरच्या पूर्वपरवानगी शिवाय येवू नये. तसेच लिडरने दुसऱ्या सेंटरच्या सहजयोग्यांची नावे परस्पर पाठवू नयेत.

कबेला पूजेला जाताना पूजा वर्गणी देणे आवश्यक आहे.

एखाद्या सेंटर लिडरची दुसऱ्या शहरात बदली झाल्यास त्याने परस्पर लिडर नेमू नये. त्याने राज्यस्तरीय लिडरच्या परवानगीनेच लिडर नेमावा. लिडर विरूद्ध सह्यांची मोहिम करणे गैर आहे. तसे वाटल्यास मोठ्या लिडरांना तोंडी कळविले तर ते प्रत्यक्ष पहाणी करून ठरवतील. श्रीमाताजींना कोणीही लेखी/दूरध्वनीवरून कसल्याच तक्रारी करू नये.

# लहान मुलांविषयी

## प. पू. श्री माताजी निर्मला देवींच्या भाषणाचा सारांश
## पर्थ (२ मार्च १९८५)

सहजयोगामध्ये पालकत्व समजावून घेणे जरूरीचं आहे.

सहजयोगामध्ये एका मुद्यावर लग्न असफल होतात. तो म्हणजे जिथे सामुहिकता टक्कर देते. जेव्हा सामुहिकतेशी टक्कर होते त्यावेळी सहजयोगी लग्ने अयशस्वी होतात. तुम्ही सहजयोगामध्ये लग्न करता आहात. इतरांचे होते त्या पद्धतीने तुमचे लग्न झालेले नाही आणि म्हणूनच प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे की सामुहिकता प्रथम येते. तुम्ही एकमेकांवर प्रेम केले पाहिजे. एकमेकांसाठी वेळ दिला पाहिजे. एकमेकांशी गोड बोलले पाहिजे. खूप दयाळू आणि समजूतदार असले पाहिजे.

जन्मतात तेव्हा मुलं चटकन परिणाम होणारी हळूवार मनाची असतात. ती फार महत्त्वाची वेळ असते ज्यावेळी आपण लक्षपूर्वक असलं पाहिजे. मुलांचे दूध उकळतांना काळजी घेतली पाहिजे. मुलांना सर्दी, बद्धकोष्ठता, जुलाब किंवा नाक वहाणं होऊ शकतं जर तुम्ही दूध वेगळं आणि पाणी वेगळं तापविले तर. तुम्ही दोन्ही एकदम तापविले पाहिजे. न उकळलेल्या स्थितीमधून उकळत्या स्थितीपर्यंत तुम्ही ते पूर्ण उकळलं पाहिजे मग थर्मॉस प्लास्कमधये ठेवलं पाहिजे किंवा जिथे तुम्हाला पाहिजे तिथे फ्रिजमध्ये किंवा कुठे असेल तिथे.

काही मुलांचं शरीर फार बारीक असतं. वजन फार कमी असतं. अशा मुलाना लिव्हरचा (यकृताचा) प्रश्न असतो. कदाचित त्यांना तो हॉस्पिटलमध्ये मिळाला असेल कारण ही आत्मसाक्षात्कारी मुलं असतात. तिथे कदाचित हिपॅटायटीस झालेला असेल. एक फार चांगलं औषध म्हणजे मुळ्याची पानं उकळायची, थोडी खडीसाखर घालायची आणि औषध म्हणून द्यायची. त्यावेळी थोड्या मुलांना सहा महिने वगैरे होइपर्यंत पाणी द्यायचं नाही. मुळ्याच्या पानांचं पाणी थोडं गरम करुन थोडं आधीसुद्धा देऊ शकता. चव काही विशेष चांगली नसेल पण खराब लिव्हरचा त्रास असलेल्या मुलांना हे चांगले औषध आहे. चंद्राचा मंत्र म्हणून लिव्हर शांत करा. डावा हात लिव्हरवर ठेऊन फोटोकडून व्हायब्रेशन्स घ्या. जेव्हा लिव्हर खराब झालं असतं. तेव्हा मुलं पुरेसं दूध पीत नाहीत आणि मग बारीक होतात. चेहरा पांढुरका दिसतो. जेव्हा शिथील लिव्हर असतं त्यावेळी त्यांना लवकर पुरळ येतात. लिव्हर शिथील असेल त्यावेळी तुम्ही त्यांना लगेच कॅल्शियमय देणं चालू केलं पाहिजे. कॅल्शियम कुठल्याही स्वरूपातलं, जर त्यांना पुरळ येत असेल तर व्हिटॅमिन ए आणि डी (जीवनसत्व अ आणि ड) दिलं पाहिजे. ॲडिक्सोलिन नावाचं औषध खूप चांगलं आहे. ते गोळीच्या स्वरूपात शार्कचं तेल आहे. चमचा द्या, दूधाने भरा. एक थेंब मध्यभागी टाका जर गोळीच्या स्वरूपात ते मिळत नसेल तर. या औषधाने त्यांना खूप छान हाडं आणि शरीर मिळतं.

काही मुलं सडसडीत अंगाची असतात. त्यांचे स्नायू विकसित झाले नसतात. स्नायूंचा विकास होण्यासाठी मसाजसारखं दुसरं काहीच नाही. चागलं मालिश करा आणि ॲडाक्सिलीन द्या. चांगलं मॉलिश तूपाने होतं. तूप डोक्यावर घालता नये. त्यासाठी खोबरेल तेल चागले, कारण त्यात "अ" जीवनसत्व असतं. मुलं खूप आरोग्यी पाहिजे. त्यांना नीट करण्यासाठी व्हायब्रेशन्स द्या.


गणपती पुळे सेमिनार मधील एक आकर्षक देखावा

खूप सुदृढ आणि स्नायू चांगले विकसित झाले पाहिजेत. बालपणात मूल चरबी जमवतं आणि त्या चरबीवर मग वाढतं. मुलाला ते अन्नासारखं असतं. लोकांची ही कल्पना की, त्यांच्या अंगावर चरबी असता नये अगदी किरकोळ असलं पाहिजे. यामुळे ते अत्यंत दुबळे होतील त्यांना तुम्ही कोणत्याही स्वरूपात कॅल्शियम देऊ शकता. पण होमिओपॅथीमध्ये कॅलकेरीआकार्ब नावाचं औषधं आहे. ते तुम्ही देऊ शकता. होमिओपॅथी मुलांसाठी चांगली पण ती द्यायला समंजस डॉक्टर पाहिजे. दूधात कॅल्शियम असतं पण दूध चरबीयुक्तने थोडी स्निग्धता आणि दूध त्यांना कॅल्शियम देइल.

काही मुलं व्यवस्थित असतात. पण त्यांची आई किंवा वडिल जास्त क्रियाशील असल्याने त्यांना एक सनवा रोग ''ओव्हरॲक्टिव्हिटी ऑफ चाइल्ड'' असा होतो. असं मूल ताबडतोब त्याच्या आईवडीलांपासून दूर केलं पाहिजे. मुख्यत्वेकरून आईपासून कारण त्यांना आईकडून ते मिळतं. आईच्या वर्तणूकीवरुन ते कळतं. असं मूलं संगोपनासाठी दुसऱ्या आश्रमात पाठवलं पाहिजे. म्हणजे मुलावर त्याचा प्रभाव पडणार नाही. मग लिव्हरवर बर्फ ठेवून लिव्हर ठीक करण्याचा प्रयत्न करा आणि उजवीकडून डावीकडे घ्या. जास्त क्रियाशीलता हा भयंकर रोग जगभर पसरला आहे. मूल एक मिनिट बसू शकत नाही. सारखं धावत सुटतं. ती भूतबाधासुद्धा असू शकते. भूत त्याला पळायला लावतं इकडे, तिकडे. मुलाला आपण मुलतः सुरेख पाया दिला पाहिजे. म्हणजे नंतर त्याचं आरोग्या त्याला त्रास देत नाही.

मूलाधाराची काळजी घेण्यासाठी सुती आतले कपडे घालणं बरं. ज्या कडक गोष्टी मुलांसाठी तुम्ही वापरता त्या त्याला घासतात. मूलाधाराला तुम्ही याप्रमाणे पोशाख दिला तर ते निघून जातं आणि दुसरे प्रश्न निर्माण करतं. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे घट्ट गाठ मारायची आणि अर्भकासाठी मऊ ठेवायचं. रबर किंवा प्लॅस्टि बाहेरच्या बाजूला घालायचं. ते सुद्धा थोडा वेळ. जर मूल ओलं झालं आणि बदललं नाही तर मुलाच्या मऊ चामडीवर लघवीमधील ॲसिडचा जळल्यासारखा परिणाम होतो. प्लॅस्टीक ऐवजी आम्ही ''बोगडी'' वापरतो. ती टॉवेलसारखी वस्तू असते. ती म्हणजे अनेक एकावर एक घड्या घातलेलं कापड असतं आणि एकत्र शिवलेलं असतं. ते मुलाच्या खाली घालतात आणि त्याखाली रबर घालतात. सर्व स्त्रियांना हे कळलं पाहिजे की ही आत्मसाक्षात्कारी मुलं आहेत आणि त्यांना ती महिन्यापर्यंत योग्य लक्ष पुरविलं पाहिजे.

अगदी लहान वयात प्रत्येकानं मुलाला स्पर्श करता नये. मुलाला उचलण्याआधी तुमचे हात तुम्ही धुतले पाहिजेत. तीन महिनेपर्यंत काळजी घ्या. तीन महिने झाल्यावर तुम्ही इतर लोकांना मूल घ्यायला देऊ शकता पण दिलं तरी फक्त मांडीवर द्या आणि नीट झाकून द्या म्हणजे तसं कोणी त्याला स्पर्श करू शकणार नाही. मुके घेणं वगैरे काही करता नये. काही लोकांना खरोखर, मुलाला कसं हाताळायचं ते माहित नसतं. मुलाला उचलताना ते दोन्ही हात उचलून उचलतात. नेहमी दोन्ही हात बाळाच्या दोन्ही बाजूला घालून बाळ उचलायचं. काही नवजात अर्भकांची छाती दुधाने भरली असते. ती रडतात आणि तुम्हाला कळत नाही. जर तुम्ही त्यांची छाती थोडीशी दाबली तर दूध बाहेर येतांना दिसेल आणि भारतात स्वच्छ धुतलेला, जंतुविरहीत केलेला अंगठा घालून दोन्ही बाजूचे टॉन्सिल्स आणि वर सुद्धा दाबतो म्हणजे टॉन्सिल्स् नंतर वाढत नाहीत. ही फार साधी गोष्ट आहे मुलांना करायची.

डोळ्याबाबत, ते योग्यरीतीने स्वच्छ करायचे आणि काजळ घालायचं. साधं काजळ करण्यासाठी थोडा कापूर जाळायचा आणि चांदीचया ताटलीवर कापूराची काजळी जमा करायची. चांदी फार थंड करणारी असते. मग ते चांगल्या तुपाबरोबर एकत्र करायचं. तूप साफ करायला वाहत्या पाण्याखाली ठेवायचं ते पूर्ण सुकलं की पाणी चिकटणार नाही. मग आंघोळीनंतर रोज मुलांच्या डोळ्यात घालायचं त्याने त्यांना तीक्ष्ण डोळे मिळतील आणि डोळ्यांचे त्रास उद्‌भवणार नाहीत.

मी पाहिले आहे की सुरवातीला आपण मुलाच्या शारिरीक बाजूकडे लक्ष पुरवतो. नंतर अहंकाराच्या भागाकडे पाहिले पाहिजे. त्यांचा अहंकार तीन महिने ते दोन वर्षामध्ये विकसित होतो. सत्यांच्या भावनिक बाजूकडे सुद्धा त्यांच्यावर प्रेम करून तुम्ही लक्ष दिले पाहिजे. त्यांना आदर बाळगायला शिकवा. तुम्हाला, मोठ्या मंडळीचा, श्रीमाताझजींचा आणि त्यांच्या स्वतःचा सुद्धा त्या वयात आदर शिकवायचा असतो. एकदा ते नमस्ते करू लागले आणि गूड मॉर्निंग त्या वयात म्हणू लागले. छोट्या छोट्या छान गोष्टी, त्याबद्दल जणू तुम्ही त्यांना बक्षिस देता आणि म्हणता फार छान. गुड मॉर्निंग म्हण मग त्याबद्दल त्यांना मुका द्या. मग त्यांना सकळतं की, काहीतरी चांगलं होतंय. आदर आणि चांगल्या भावना जोपासण्यासाठी ते सर्वात जास्त छाप पाडणारं वय असतं. मूल दुसऱ्या बाईलासुद्धा

मुलाकडे लक्ष द्यायला द्या. मग मूल हे सर्वांची मालमत्ता बनतं, नुसती तुमचीच नाही. मग मुलाला चांगली सामुहिकता येते आणि मुलाधारसुद्धा चागलं विकसित होते.

तुम्हाला जर फक्त एकाच व्यक्तीची सवय असते, समजा आईची, तर वयात आल्यावर दुसऱ्या कोणाशीही तुमचा संबंध आल्यास त्याविषयी विषयात्मक भावना उत्पन्न होतात. पण जर अबोधितेच्या काळात या उदात्त भावनांना तुम्ही आधीच स्पर्श केला असेल तर ही निरर्थक गोष्ट होत नाही. तेव्हा इतर लोकांबरोबर मुलाला मिसळू द्या. प्रत्येकाशी बोलू द्या पण अजून आईवडिलांच्या खोलीत झोपू द्या. मूल दोन वर्षाचे होईपर्यंत त्याला आईवडिलांच्या खोलीत राहू द्या. दोन वर्षापर्यंत मुलाला दुसऱ्या पाळण्यात ठेवा. पण ते मोठं झालं म्हणजे समजा दोन वर्षानंतर वगैरे ते दुसऱ्या खोलीत सामुहिकतेमध्ये झोपू शकेल. कोणीतरी मोठं माणूस तिथे पाहिजे. मग त्याने आईवडिलांबरोबर झोपता नये. सामुहिकता जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांचे कपडे जवळ ठेवा. त्यांच्या वस्तू जवळ ठेवा; ते कोणा एका व्यक्तिचे असायला नको. त्यांना एकत्र असू दे. आईवडिलांपासून दूर हे महत्त्वाचं आहे. सहा वर्षापर्यंत ती स्वतंत्र होतात. ती मोठ्या व्यक्तिचा आदर करू लागतात. प्रत्येकाला व्यवस्थित संबोधतात. त्यांच्याशी बोलतात आणि नीट वागतात. सहा वर्षानंतर ती खरोखर परिपक्व चांगली मुले होतात. नंतर ती त्यांचे शिक्षण घेऊ लागतात.

पाच वर्षापर्यंत तुमच्या मुलांना ती चांगली नसल्यास मार देऊ शकता. जर ती वात्रट असतील तर तुम्ही त्यांना खोलीत नेऊन एकदा सांगितलं पाहिजे की तुम्ही नीट वागला नाही तर आम्ही तुम्हाला मार देऊ. त्यांना वेगळे सांगा. इतरांच्या समोर नको आणि ओरडू नका. मुलांना कधीही इतरांसमोर सुधारू नये. त्याला खोलीत न्या आणि सांगा. ''आता बघ, आम्ही माताजींना भेटायला जात आहोत. श्रीमाताजी देवी आहेत. तुला त्याप्रमाणे वागले पाहिजे. आपण त्यांच्या घरी जाणार आहोत. आणि तुम्ही काहीही विचारता कामा नये. तुम्हाला गप्प बसलं पाहिजे आणि नीट वागलं पाहिजे.''



गणपतीपुळे सेमिनार मधील एक आकर्षक देखावा

हे वय आहे तेव्हा तुम्ही त्यांना आत्मसन्मान म्हणजे काय ते सांगितलं पाहिजे. तुम्ही त्यांना सांगा, '' जर तुम्ही गोष्टींची भीक मागितली तर ते तुला भिकारी म्हणतील. तू भिकाऱ्याचा मुलगा आहेस असं त्यांना वाटेल.'' आपण माननीय लोकांसारखं वागलं पाहिजे. आता तुम्ही राजासारखे आहात. तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहात. या सर्व कल्पना सहा वर्षाच्या वयात त्यांच्या डोक्यात घातल्या पाहिजेत. समजा वयाच्या चाळीसाव्या वर्षी तुम्ही त्यांना आत्मसन्मान शिकवू लागला तर ते शक्य नाही. वयाच्या दहाव्या वर्षीसुद्धा ते शक्य नाही. दुसऱ्या वर्षापासून सहाव्या वर्षापर्यंत ते केले पाहिजे. आत्मसन्मान, स्वच्छता, व्यवस्थितपणा, शिस्त यांची जाणीव फक्त याच वयात होऊ शकते. ही फार महत्त्वाची वेळ आहे. कारण पहिले तीन महिने त्यांना स्तनपान मिळतं. तीन महिने ते दोन वर्ष ते मधल्या स्थितीमध्ये असतात. दोन ते सहा वर्ष हा खरा काळ आहे. त्यावेळी मडकं तयार असतं पण भाजलं गेलं नसतं. दोन ते सहा वर्षे ही वेळ आहे. जेव्हा तुम्ही त्याला भट्टीत भाजता. पण ते भाजण्याआधी तुम्ही सर्व ठसे पाडता आणि सहानंतर भट्टीत घालता ती करायला फार साधी गोष्ट आहे. मूल करणे ही मोठी निर्मिती आहे. जसे मला वाटतं सहजयोगी तयार करणे ही मोठी निर्मिती आहे. माणूस तयार करणे ही महान कलाकृतीची गोष्ट आहे. ती देवाने तयार केलेली सर्वात मोठी गोष्ट आहे. या वयात तुम्ही त्यांचे विशेष कौशल्य शोधू शकता त्यांची आवड काय आहे? त्यांना संगीतात रूची आहे का? जसं संगीत सुरू होतं तो त्याचमधील ताल बघू शकेल किंवा नाचेल किंवा इतर काही मार्गाने ज्या काही त्यांच्या विशेष कौशल्याच्या गोष्टी आहेत त्या सुरूवातीपासून शोधल्या पाहिजेत. मुलांवर काही एक लादू नका. काही मुलं गणितामध्ये फार हुशार असतात पण बाकीची नसतात. जर ते मू हस्तवयवसायात फार चांगलं असेल तर त्याला हस्तव्यवसाय करू दे सर्व ज्ञान एकसारखेच आहे. सहजयोगात असं काहीच नाही की हे ज्ञान त्या ज्ञानाहून उच्च दर्जाचे आहे. नाहीतरी ही सारी अविद्या

आहे. फक्त एवढंच की तुम्हाला त्याचं तंत्रज्ञान हवं. तुम्हाला हवं ते कसं तयार करायचं. एवढंच. तुमही जेंव्हा शिकता तेव्हा काहीही उच्च किवा नीच नाही. तेव्हा मुला जे आवडतं ते त्याला करू द्या. त्याला सांभाळू दे. सर्व काही हस्तगत होइल. काही मुलांना आवड असते. खोली स्वच्छ ठेवणे, सर्व काही स्वच्छ ठेवणे, जेवण करणे वगैरे ती हॉटेल मॅनेजर्स होतील.

नर्स होण्याचा खेळ ते खेळू शकतात. त्यांना थोडं खाणं दिलं पाहिजे. मग ते म्हणतात ''तुम्ही खा, नाहीतर तुम्ही आजारी पडाल.'' इतकं गोड असतं ते. माझ्या नातवंडांना त्यांच्या आईने सांगितलं ''घरी जर कोणी आलं तर तुम्ही त्यांना बसविले पाहिजे. खायला काही दिलं पाहिजे. पंखा लावला पाहिजे. त्यांना सुखसोई वाटली पाहिजे. तर आमचा धोबी आला आणि त्यांनी म्हटलं तू सोफ्यावर बस तो काही बसेना, पण त्यांनी त्याला बळजबरीने सोफ्यावर बसविले. पंखा लावला, फ्रीजमधलं खाणं आणलं. त्याला बळेबळे खायला लावलं. जेंव्हा माझी कन्या आत आली तेव्हा तीने त्यांना पाहिजे. धोबी घाईघाईने उठला आणि म्हणाला, ''मी काय करू, त्यांनी मला दिलं, मी त्यांना थांबवू शकत नव्हतो. ती म्हणाली ठिक आहे. तू खाऊन घे जेव्हा मूल कोणाला काही देतं, तेव्हा तुम्ही त्याचं कौतुक केलं पाहिजे. त्यांना द्यायला शिकवा.


दुसऱ्याचे कौतुक करायलासुद्धा त्यांना तुम्ही शिकविलं पाहिजे. जर ती दुसऱ्यांवर टीका करू लागली तर नुसतं ऐकू नका. जेव्हा ती दुसऱ्याचं कौतुक करतील तेव्हा ऐका. हे सहा वर्षापर्यंत जर ती दुसऱ्याशी भांडत असतील. तर त्यांना दोन काठ्या द्या. आणि एकमेकांना मारायला सांगा. त्यांना कळेल. ''एकमेकांना चांगले मारा आणि तुम्ही दोघे चांगले जखमी झाला की, आम्ही तुम्हाला हॉस्पिटलमध्ये नेवू. चला करा मारामारी.'' ती का भांडत आहेत हे तुम्ही बघितलं पाहिजे. मुलांचे एक मानसशास्त्र म्हणजे लक्ष वेधून घेणं. ज्या मुलाला लक्ष वेधून घ्यायचं असेल तो शिवीगाळ करेल. तुम्ही म्हणाल, ''त्याबद्दल मी तुला मारेन'' तर तो परत तेच म्हणेल, पण तुम्ही त्यांच्याकडे लक्ष दिले नाही तर तो ते विसरून जाईल. पूर्ण दृष्टीकोन तुमचे लक्ष वेधून घेणे. गोडव्याने असेल कसेही पण तुम्ही ते कसेही करत असलेल्या काही चांगल्या गोष्टीकडे लक्ष दिले तर ती ते परत करतील.

०००

## गणपतीपुळे सेमिनार मध्ये भारतातुन वेगवेगळ्या प्रांतातुन आलेल्या सहजयोग्यांची माहिती (मुंबईत नोंदणी झालेले)

| | | |
|---|---|---|
| (१) मुंबई | – | ८९९ |
| (२) पुणे | – | ३५८ |
| (३) नाशिक | – | २२४ |
| (४) ... महाराष्ट्र | – | ८७९ |
| (५) पश्चिम भारत | – | १५८ |
| (६) दिल्ली | – | ५८३ |
| (७) उत्तर प्रदेश | – | ७७८ |
| (८) उत्तर भारत | – | ७७ |
| (९) पूर्व भारत | – | २०२ |
| (१०) दक्षिण भारत | – | ४४४ |
| (११) व्हॉलेंटीअर्स | – | १०० |
| | एकूण | ५२०९ |









ALA DHARMA

